वसा सक्षम मातृत्वाचा
MOM-able™
फर्टिलिटी अँड टेस्ट ट्यूब बेबी सेंटर
सोमवार ते शनिवार सकाळी १० ते ४
आता मुंबई, पुणे, नाशिक या शहरात जाण्याची गरज नाही
IVF
ट्रिटमेंटने घ्या मातृत्वाचा आनंद आपल्या संगमनेरमध्ये
आजच आपली अपॉईंटमेंट बुक करा
8080 215 215
9699 327 301
दुसरा मजला, संजीवन हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर नाशिक-पुणे रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264 ◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆ पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

काजळे ज्वेलर्स
आजचे सोन्याचे भाव
22 कॅरेट हॉलमार्क दागिणे = 1, 45, 200/-
20 कॅरेट मणी = 1, 32, 005/-
18 कॅरेट रोज गोल्ड = 1, 18, 795/-
16 कॅरेट मुरणी = 1, 05, 600/-
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर
मो. 9601222777, 9615222777

वर्ष १९ वे । अहिल्यानगर । अंक ६० । किंमत - ४ रू । संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) मंगळवार । १०/०३/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# महिलांच्या सुरक्षेसाठी संगमनेरमध्ये ‘रक्षक दल’



## संगमनेर नगरपरिषदेचा अभिनव उपक्रम

### शहरात रक्षक दलाची भव्य रॅली

**जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने नगरपालिकेने राज्यात अभिनव उपक्रम राबवून रक्षक दल स्थापन केले आहेत. तात्काळ सुरक्षेसाठी ९०६७२७३२७३ हा संपर्क क्रमांक उपलब्ध असून चार चाकी वाहन व दोन बुलेट गाड्या असलेल्या या रक्षक दलाने संगमनेर शहरातून भव्य रॅली काढली यामध्ये स्वतः नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे यांनी सुरक्षा रक्षक वाहन चालवून नेतृत्व केले. या अभिनव उपक्रमाचे संपूर्ण संगमनेरमधून अभिनंदन होत आहे.**

युवावार्ता प्रतिनिधी)

संगमनेर -लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर हे सुसंस्कृत व वैभवशाली म्हणून राज्याला परिचित आहे. या शहरात महिला मुली व नागरिकांच्या तात्काळ सुरक्षेसाठी आमदार सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्रात प्रथमच नगरपरिषदेच्या पुढाकारातून रक्षक दल ही संकल्पना राबविण्यात आली असून नागरिकांच्या सेवेसाठी या रक्षक दलाचा शुभारंभ झाला.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे नगर परिषदेच्यावतीने जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रक्षक दलाचा शुभारंभ केला. यावेळी मा. नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे, आमदार सत्यजित तांबे, नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे, एकविराच्या अध्यक्षा डॉ. जयश्रीताई थोरात, उपनगराध्यक्ष नूर मोहम्मद शेख, काँग्रेसचे शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे, माजी नगराध्यक्ष विश्वासराव मुर्तडक, नितीन अभंग, दिलीपराव पुंड, किशोर टोकसे, नगरसेविका सीमा खटाटे, भारत बोराडे, अर्चना दिघे, सौरभ कासार, शोभा पवार, प्राची काशीद, डॉ.अनुराधा सातपुते, वनिता गाडे, गजेंद्र अभंग, अमजद पठाण, विजया गुंजाळ, शकीला बेग, सरोजना पगडाळ, डॉ. दानिश, प्रियंका शहा, नंदा गरुडकर, शैलेश कलंत्री, मुजीब खान पठाण, प्रांताधिकारी अरुण उंडे, तहसीलदार धीरज मांजरे, उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक समीर बारवकर, आयडीबीआय बँकेचे मॅनेजर निखिल सावंत, विशाल बोरस्ते, विवेक आंचन, एमएसएफचे प्रकाश रावते, मुख्याधिकारी दयानंद गोरे, राजेंद्र गुंजाळ, प्रल्हाद देवरे, निखिल पापडेजा आदींसह विविध अधिकारी उपस्थित होते.

संगमनेर शहरातील महिला, मुली व नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलीस यंत्रणेबरोबरच नगरपरिषदेने तात्काळ सुरक्षा मिळावी याकरता आमदार सत्यजित तांबे यांच्या संकल्पनेतून राज्यात प्रथमच रक्षक दल स्थापन केले आहे. कुठे काही अनुचित घटना घडल्यानंतर तात्काळ ९०६७२७३२७३ या नंबर वर संपर्क केल्यास रक्षक दल उपस्थित राहणार आहेत. यामुळे गैरवर्तन करणाऱ्यांना मोठी चपराक मिळणार आहे. आयडीबीआय बँकेच्या वतीने नगर परिषदे करता चार चाकी वाहन व दोन बुलेट गाडी दिली असून या माध्यमातून हे जवान तात्काळ उपस्थित राहणार आहेत.

याप्रसंगी बोलताना आमदार तांबे म्हणाले की महाराष्ट्रात प्रथमच ही अभिनव संकल्पना राबविण्यात आली असून हा छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र आहे. महिलांचा सन्मान आणि नागरिकांना सुरक्षा हे प्रत्येकाचे मूलभूत कर्तव्य असून पोलीस यंत्रणे बरोबरच हे रक्षक दल त्वरित सुरक्षेसाठी सेवा देणार आहेत . यावेळी नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे म्हणाल्या की संगमनेर नगर परिषदेच्या सर्व कामांमध्ये नागरिकांचा मोठा सहभाग असून नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत ही अभिनव संकल्पना राबवण्यात आली आहे याचबरोबर विविध विकास कामांमधून संगमनेर हे सर्वांना सोबत घेऊन आणखी पुढे घेऊन जाण्यासाठी आपला प्रयत्न असणार आहे असे त्या म्हणाल्या.

# विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधकांचे आंदोलन

## सातबारा कोरा करण्याची मागणी



मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्र विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान, विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर तीव्र आंदोलन केले. शेतकऱ्यांचा सातबारा पूर्णपणे कोरा करावा, ही विरोधकांची प्रमुख मागणी आहे. यंदाच्या अर्थसंकल्पात सरकारने दोन लाखांपर्यंतचे कृषी कर्ज माफ करण्याची घोषणा केली आहे. मात्र, विरोधकांनी या घोषणेवर टीका करत, ही कर्जमाफी अपुरी असल्याचे म्हटले आहे.

सातबारा कोरा करा, नाहीतर खुर्च्या खाली करा, फसवणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, शेतकरी उपाशी, मंत्री तुपाशी अशा घोषणा देत विरोधकांनी सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. हातामध्ये शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करा, निकषांचा खेळ सोडा असे बॅनर घेऊन त्यांनी घोषणाबाजी केली. विरोधकांचा आक्षेप आहे की, सरकारने अटी व शर्ती लावून शेतकऱ्यांना पूर्ण दिलासा दिला नाही, त्यामुळे संपूर्ण सातबारा कोरा होणे आवश्यक आहे. विधानभवनाच्या पायऱ्यांवरून सुरू असलेले हे आंदोलन शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी असल्याचे विरोधकांनी सांगितले.

# मोदी अमेरिकेच्या ताटाखालचे मांजर - सपकाळ




मुंबई (वृत्तसंस्था)

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सोमवारी पुन्हा एकदा केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारवर निशाणा साधला आहे. अमेरिकेशी व्यापार करार करून केंद्र सरकार अमेरिकेला अक्षरशः शरण गेले आहे. त्यांनी अमेरिकेच्या ताटाखालचे मांजर न होता धडाडीबाण्याने भारताची भूमिका स्वीकारावी. विरोधकांना व जनतेला सोबत घ्यावे असे त्यांनी म्हटले आहे.

हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वात हिंगोलीत भारत-अमेरिका व्यापार कराराविरोधात शेतकरी संघर्ष पदयात्रा काढण्यात येत आहेत. या पदयात्रेपूर्वी पत्रकारांशी संवाद साधताना हर्षवर्धन सपकाळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकारवर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले, केंद्र सरकारने अमेरिकेशी व्यापार करार केला तेव्हापासून देशातील सर्वच शेतमालांचे भाव पडले आहेत. फळांच्या बाबतीतही शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागत आहे.

केंद्र सरकार ही सगळी परिस्थिती हाताळण्यात अपयशी ठरले आहे. त्यांनी अमेरिकेकडे हा देश विकण्यास काढला आहे. त्याचा निषेध व्यक्त करण्यासाठी आम्ही हिंगोलीत शेतकऱ्यांच्या आक्रोषाची पदयात्रा काढत आहोत. ही आमची निदर्शने आहेत. सरकारला जाग यावी ही यामागील आमची भूमिका आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, आदिवासी, मागासवर्गीय या सर्वांचा आक्रोष या पदयात्रेच्या माध्यमातून केला जाईल, असे ते म्हणाले.हर्षवर्धन सपकाळ यांनी यावेळी देशांतर्गत इंधनाच्या दरवाढीवरही निशाणा साधला. क्रूड ऑईल स्वस्त होते तेव्हा त्याचा कोणताही लाभ भारतीय नागरिकांना दिला जात नाही. पण तुटवड्याची परिस्थिती निर्माण झाली की, सरकार भांडवलदारांना अनुकूल असणारी दरवाढ करते. गॅस दरवाढीच्या निमित्ताने आपल्याला त्याचा अनुभव आला आहे. सरकार अशा आणीबाणीच्या परिस्थितीसाठी तयार नाही. कोणत्याही प्रकारचे त्यांच्याकडे नियोजन नाही. सरकारकडे कोणतेही आंतरराष्ट्रीय धोरण नसल्यामुळे भारताला अशा प्रकारच्या एका परिस्थितीतून जावे लागत आहे.

केंद्र सरकारने आपले डोळे उघडून याकडे नीट पहावे. संसदेत चर्चा करावी. विरोधकांना सोबत घ्यावे. भारतीय नागरिकांनाही सोबत घ्यावे व या परिस्थितीतून पुढे जावे. सरकारने अमेरिकेच्या ताटाखालचे मांजर न होता त्यांनी धडाडीबाण्याने भारताची भूमिका स्विकारावी. सर्व देश त्यांच्यासोबत येईल, असे सपकाळ म्हणाले. हर्षवर्धन सपकाळ यांनी रविवारी पंतप्रधान मोदी व अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा एक फोटोही ट्विट केला होता. त्यात मोदी डोनाल्ड ट्रम्प यांना 'सर, मी ङझत्रः गॅस सिलेंडरची किंमत वाढवू शकतो का?' असे विचारताना दिसून येत आहेत. विशेष म्हणजे ट्रम्प या फोटोत आपल्या खुर्चीवर बसताना तर मोदी दरवाज्यात उभे राहून त्यांना हा प्रश्न विचारताना दिसून येत आहेत. या फोटोवर नेटकऱ्यांनी संमिश्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

# कॅनलमध्ये पडून सोळा वर्षीय मुलाचा दुर्दैवी मृत्यू; कुरण गाव शोकसागरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - एकीकडे रंगपंचमीचा उत्साह आणि दुसरीकडे रमजान महिन्यात रोजे सुरू असतानाच संगमनेर तालुक्यातील कुरणगाव येथे घडलेल्या एका दुर्दैवी घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. कॅनलमध्ये पडून १६ वर्षीय अल्पवयीन मुलाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. ८ मार्च) सायंकाळी चार ते साडेपाचच्या सुमारास घडली.

वाजिद मोहसीन शेख (वय १६) असे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव आहे. तो मूकबधिर शाळेत इयत्ता पाचवीत शिक्षण घेत होता. कुरणगाव परिसरातील कॅनलजवळ असताना तो पाण्यात पडल्याने ही दुर्दैवी दुर्घटना घडल्याचे सांगितले जात आहे. वाजिद पाण्यात पडल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी आरडाओरडा केला. काही क्षणातच घटनास्थळी मोठी गर्दी जमली. दरम्यान, तेथे उपस्थित असलेल्या राष्ट्रीय जलतरणपटू ॲड. सदाशिव थोरात यांनी धाडस दाखवत कॅनलमध्ये उडी घेत वाजिदला बाहेर काढले. त्यावेळी तो बेशुद्ध अवस्थेत होता. त्यानंतर तातडीने त्याला पुढील तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर त्याचा मृत्यू झाल्याचे घोषित केले.

विशेष म्हणजे वाजिद रमजान महिन्यात रोजे पाळत होता. रविवारी त्याचा १८ वा रोजा सुरू होता. वाजिदच्या पश्चात आई-वडील, दोन भाऊ आणि एक बहीण असा परिवार आहे. अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत राहणाऱ्या शेख कुटुंबावर या घटनेमुळे दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे कुरण गाव परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेबाबत शहर पोलिसांकडून पुढील चौकशी सुरू असून शवविच्छेदन अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. दरम्यान वाजिद शेख याच्यावर रविवारी रात्री उशिरा दफनविधी करण्यात येणार असल्याची माहिती निकटवर्तीयांनी दिली.

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त ऑफर मिळतेय जबरदस्त !
FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

ओममयूर® ज्वेलर्स
गुढीपाडवा विशेष ऑफर!
दागिन्यांच्या मजुरीवर 10 ते 40 पर्यंत भरघोस सूट!
ऑफर कालावधी: ६ ते २२ मार्च २०२६
आजच शोरूमला भेट द्या आणि नव्या वर्षाची सोनेरी सुरुवात करा!
सोने । चांदी । हिरे | अशोक चौक, संगमनेर. मो : ९३७०१ २०४४

# महिला दिनानिमित्त मराठा पतसंस्थेकडून सौ. नलिनी कळसकर यांचा होणार सन्मान



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मराठा नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहिल्यानगर शाखा संगमनेर यांच्या वतीने समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सौ. नलिनी सोमनाथ कळसकर यांचा सन्मान करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम मंगळवार दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९.३० वाजता पेन्शनर्स भवन, इंदिरा नगर, संगमनेर येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ नागरिक संघ, संगमनेरचे अध्यक्ष शिवश्री डॉ. सोमनाथ सातपुते राहणार आहेत. तर गृहलक्ष्मी सहकारी पतसंस्था मर्या., संगमनेर यांच्या संस्थापक चेअरमन सौ. प्रा. आशाताई भांगरे यांच्या शुभहस्ते सन्मान सोहळा पार पडणार आहे.

या वेळी राष्ट्रपती पारितोषिक विजेते शिवश्री सोमनाथ कळसकर (गुरुजी), माजी वन विभागीय उपअधिकारी व बाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष शिवश्री शिवाजीराव फटांगरे, युवावार्ता संपादक व पत्रकार सेवा संघ मुंबईचे अध्यक्ष शिवश्री किसन भाऊ हासे (पान ३ वर)

# शरयूताई देशमुख यांना उदम हिरकणी पुरस्कार




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेच्या कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख यांना छत्रपती संभाजीनगर येथील उदम इन्फो सोल्युशन लिमिटेड या संस्थेच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने उदम हिरकणी पुरस्कार देऊन गौरवण्यात आले आहे.

अमृतवाहिनी एमबीएमध्ये झालेल्या उद्योजकता विकास या एकदिवशीय कार्यशाळेत हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी व्यासपीठावर उदम इन्फो सोलुशनचे डॉ. रुपेश खांडळकर, स्नेहल धोंगडे, एमपीएससी संचालक डॉ. बी. एम. लोंढे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. छत्रपती संभाजीनगर येथील उद्धव इन्फो सोलुशन प्रायव्हेट लिमिटेड या संस्थेच्या वतीने दरवर्षी सामाजिक विकास शिक्षण ग्रामीण विकास शेती सेवाक्षेत्र स्वयंरोजगार व महिला सक्षमीकरण या क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांना आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने उदम पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येते.

शरयूताई देशमुख यांनी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षण क्षेत्रात योगदान देताना अमृतवाहिनी शिक्षण संस्थेची गुणवत्ता वाढवण्याबरोबर सातत्याने सामाजिक उपक्रम वाढवले आहे याचबरोबर या संस्थेमधील विद्यार्थ्यांचा आंतरराष्ट्रीय पातळीवर समन्वय निर्माण करून अनेक विद्यार्थ्यांना चांगल्या नोकरीच्या संधी मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. महिला सक्षमीकरण शिक्षण यामध्येही सातत्याने योगदान दिले असून त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना सन्मानचिन्ह प्रमाणपत्र देऊन उदम इन्फो सोल्युशनने उदम हिरकणी पुरस्काराने गौरविले.

सौ. शरयूताई देशमुख यांना या जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मिळालेल्या या पुरस्काराबद्दल लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, सौ. दुर्गाताई तांबे, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, अकॅडमी डायरेक्टर डॉ. जे. बी. गुरव, प्राचार्य डॉ. एम. ए. व्यंकटेश, डॉ. बी. एम. लोंढे, डॉ. मनोज शिरभाते, डॉ. मच्छिंद्र चव्हाण, जेबी सेटटी, अंजली कन्नावार, विलास भाटे, आशिष कुमार, यांच्यासह सर्व विभाग प्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी एक कोटीचा निधी - आ. अमोल खताळ




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील बसस्थानक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी एक कोटी रुपयाचा निधी मंजूर झालेला आहे. जागेबाबत गेल्या वर्षभरापासून संघर्ष सुरू आहे. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बसस्थानक परिसरात २०० ते २५० स्क्वेअर फूट जागा उपलब्ध करून दिली असली तरी एवढ्या मर्यादित जागेत छत्रपतींचे स्मारक उभारणे शक्य नसल्याने विस्तृत जागेची मागणी करण्यात आली आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून बसस्थानक परिसरातच अश्वारूढ पुतळा उभारला जाईल, असा ठाम विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त संगमनेर शहराच्या विविध भागातून काढण्यात आलेल्या मिरवणुकांची सांगता बसस्थानकाजवळ शिवसेना महायुतीच्यावतीने उभारण्यात आलेल्या अश्वारूढ पुतळ्यास आमदार खाताळ आणि त्यांच्या पत्नी नीलम खाताळ यांनी क्रेनच्या साह्याने पुष्पहार अर्पण करून महाआरती करण्यात आली.

आमदार खताळ म्हणाले, तालुक्यात परिवर्तन झाल्यानंतर मागील वर्षाप्रमाणे याहीवर्षी तिथीनुसार व तारखेनुसार शिवजयंती उत्सव महायुतीच्यावतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. संगमनेरकरांची अनेक वर्षांपासून शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा व्हावा, अशी मागणी होती ही मागणी आता पूर्णत्वास जात आहे. यापुढेही छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज तसेच सर्व महापुरुषांच्या जयंती उत्सव उत्साहात साजरा केल्या जातील असेही शेवटी आमदार खताळ यांनी सांगितले.

छत्रपती शिवाजी महाराज जसे रयतेच्या हितासाठी काम करत होते, त्याचप्रमाणे राज्यातील महायुतीचे सरकारही रयतेसाठी काम करत आहे.

# युद्धावर राज्यसभेत गदारोळ, विरोधकांचा सभात्याग

## भारत शांतता आणि चर्चेच्या बाजूने - एस. जयशंकर

मुंबई (वृत्तसंस्था)

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सोमवारपासून सुरू झाला. विरोधक लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना हटवण्यासाठी लोकसभेत प्रस्ताव आणणार आहेत. दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी राज्यसभेत अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धावर भाषण दिले.

परराष्ट्र मंत्र्यांनी बोलण्यास सुरुवात करताच सभागृहात गदारोळ सुरू झाला. विरोधकांनी सभात्याग केला. जयशंकर म्हणाले, 'यावेळी इराणच्या नेतृत्वाशी संपर्क साधणे कठीण आहे, परंतु भारत शांतता आणि चर्चेच्या बाजूने आहे.' काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, 'मध्यपूर्वेतील युद्धाचा भारतावर परिणाम, ऊर्जा संकटावर थोडक्यात चर्चा व्हावी.'

लोकसभेत अध्यक्ष ओम बिर्ला यांना हटवण्याच्या मागणीवरील विरोधकांच्या प्रस्तावावर चर्चा होणार आहे. यावरून जोरदार गदारोळ होण्याची शक्यता आहे. काँग्रेससह विरोधी पक्षाच्या ११८ खासदारांनी १० फेब्रुवारी रोजी लोकसभा सचिवालयाला स्वाक्षरी केलेले निवेदन सादर केले होते. अध्यक्ष सभागृहाच्या कामकाजात निष्पक्षता दाखवत नाहीत आणि विरोधकांना पुरेसा संधी देत नाहीत, असा आरोप त्यांनी केला होता. मुंबईच्या शिपिंग डायरेक्टरेट जनरलने १४ जानेवारी रोजी भारतीय खलाशांना सांगितले होते की त्यांनी दूतावासाच्या सल्ल्याचे पालन करावे आणि अनावश्यकपणे किनाऱ्यावर ये-जा करणे टाळावे.

# मधमाशी शेतीमुळे शेतकऱ्यांमध्ये समृद्धी येईल - ना. रवींद्र साठे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - मधमाशी पालन हा अत्यंत फायदेशीर शेतीपूरक व्यवसाय असून, मधमाशी वसाहतींच्या मध उत्पादनातून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होऊ शकते. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या माध्यमातून मध ५०० रुपये किलो दराने खरेदी केला जात असल्याने शेतकऱ्यांना शाश्वत आधार मिळत आहे. असे महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सभापती रवींद्र साठे म्हणाले.



शनिवारी साठे हे अहिल्यानगर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना त्यांनी संगमनेरातील शासकीय विश्रामगृहात पत्रकारांशी संवाद साधला. मंडळाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नित्यानंद पाटील, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी बाळासाहेब मुंडे, मध संचालक रघुनाथ नारायणकर, राष्ट्र सेवा दलाचे माजी प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ अवसक, अहिल्यानगर माध्यमिक शिक्षक सोसायटीचे उपाध्यक्ष अर्जुन वाळके आदी उपस्थित होते.

सभापती साठे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मधक्रांती' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ वेगाने पावले उचलत आहे. मधमाशी पालनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ काम करत आहे.

मंडळाच्या माध्यमातून राज्यातील दहा जिल्ह्यांमधील दहा गावांची मधमाशी पालनासाठी निवड करण्यात आली आहे. या योजनेसाठी पाच कोटी दहा लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यात मधमाशी पालनाचा विस्तार व्हावा, यासाठी मंडळ प्रयत्नशील आहे. मधमाशी ही निसर्गासाठी मोठे वरदान आहे. याबाबत अधिकाधिक जनजागृती केली जाते आहे.

भविष्यात मधमाशीच्या विषाचे संकलन करण्याचा मोठा प्रकल्प राबविण्याचा आमचा विचार आहे. या विषाला आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी किंमत आहे. खादी ग्रामोद्योग मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करणे हा मुख्य उद्देश आहे. २० मे हा जागतिक मधमाशी दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी उत्कृष्ट मध संकलन करणाऱ्या व्यक्तींना 'मधु मित्र' आणि महिलांना 'मधु सखी' पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याचेही साठे यांनी सांगितले.

# कर्तृत्ववान महिलांचा आदर्श घ्या - पो. कॉ. संगीता डुंबरे



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - स्त्रीने अबला न राहता सबला होणे ही आजच्या काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांनी आपला मौल्यवान वेळ सोशल मीडियावर वाया घालवण्याऐवजी अभ्यासात तसेच विविध चांगल्या गोष्टी शिकण्यात घालवावा. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्री सक्षमपणे पुढे जात असून चुलीपासून सुरू झालेला तिचा प्रवास आज अंतराळापर्यंत पोहोचला आहे. त्यामुळे सर्वांनी कर्तृत्ववान महिलांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून त्यांच्याकडून प्रेरणा घ्यावी, असे प्रतिपादन पोलीस कॉन्स्टेबल संगीता डुंबरे यांनी केले.

येथील मातोश्री रु. दा. मालपाणी विद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. याप्रसंगी मंचावर मुख्याध्यापक उत्तम एरंडे, पर्यवेक्षिका रंजना पवार तसेच ज्येष्ठ शिक्षिका संगीता परदेशी उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात स्त्रीशक्तीचा जागर करणाऱ्या गीताने तसेच सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. प्रास्ताविक प्रणिती मुकुंद सातपुते हिने केले, तर परिचय व सत्काराचे निवेदन आदिती सुरेश फटांगरे हिने केले.

निपुण भारत कार्यक्रमांतर्गत सुमन शिंदे, सुनिता काकड व रंजना दुर्गुडे या महिलांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. रंजना पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी घरातील आई-वडिलांचे ऐकून त्यांचा आदर करावा. विशेषतः आईच्या कामात शक्य तितकी मदत करून घरातील जबाबदारीची जाणीव ठेवावी. लहानपणा पासूनच चांगले संस्कार अंगी बाणवून शिस्त, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे पालन केले तरच विद्यार्थी भविष्यात चांगले नागरिक बनू शकतात. शिक्षणाबरोबरच संस्कार आणि शिस्त यांचे महत्त्व लक्षात ठेवून प्रत्येक विद्यार्थ्याने आदर्श वर्तन ठेवावे असे सांगितले.

कार्यक्रमात श्रद्धा विकास कोकणे, आर्या जयराम थिटमे, अक्षरा सचिन भालेराव, संस्कृती रमेश गुंजाळ व स्वरा सचिन नाईकवाडी या विद्यार्थिनींनी महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर आपली मनोगते व्यक्त केली. सूत्रसंचालन प्रांजल सुनील वाडेकर व शर्वरी सुधीर हासे यांनी केले, तर आभार पल्लवी रवींद्र गाडेकर हिने मानले.

# व्हिएसआर कंपनीला वाचविण्याचा प्रयत्न

## आ. रोहित पवारांचे प्रफुल्ल पटेल यांच्यावर गंभीर आरोप

मुंबई (वृत्तसंस्था)

अजित पवारांचं २८ जानेवारीला विमान अपघातात निधन झालं. त्यांच्या निधनानंतर एका महिन्याने एअरक्राफ्ट ॲक्सिडेंट इन्व्हेस्टिगेशन ब्युरो अर्थात एएआयबीचा प्राथमिक चौकशी अहवाल समोर आला. एएआयबीच्या प्राथमिक अहवालात विविध निष्कर्ष मांडण्यात आलेले आहेत. मात्र, एएआयबीने सादर केलेला प्राथमिक चौकशी अहवाल दिशाहीन असून केवळ रंगरंगोटी करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप रोहित पवारांनी केला आहे.



अजित पवार यांचा अपघात की घातपात? याबाबत रोहित पवारांनी अनेक शंका उपस्थित करत मुंबई आणि दिल्लीत पत्रकार परिषदा घेऊन अनेक सवाल उपस्थित केले आहेत. व्हीएसआर कंपनीवरही रोहित पवारांनी अनेक आरोप केले आहेत. तसेच मागील काही दिवसांपासून रोहित पवार हे देशातील विविध नेत्यांच्या भेटी घेऊन अजित पवारांच्या विमान अपघातासंदर्भात माहिती देत असून अजित पवारांना न्याय मिळवून देण्यासाठी हा विषय संसदेत मांडण्याची मागणी करत आहेत.

दरम्यान, यातच आज रोहित पवारांनी एक्सवर (ट्विटर) केलेल्या एका पोस्टची राजकीय वर्तुळात मोठी चर्चा रंगली आहे. 'प्रफुल पटेलजी व्हीएसआर कंपनीच्या मालकाच्या मुलाच्या लग्नाला तुम्ही गेला होतात का?' असा सवाल रोहित पवारांनी केला आहे. तसेच 'जर तुम्ही त्या लग्नाला गेला असाल तर तेथे आणखी कोण नेते होते? याबाबत पत्रकार परिषद घेऊन उद्या स्पष्टीकरण द्या', असं आव्हान रोहित पवार यांनी प्रफुल पटेल यांना दिले आहे.

मा.प्रफुल पटेलजी (माजी केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री) आपणास विनंती आहे की, अजितदादांच्या अपघाताला/घातपाताला कारणीभूत असलेल्या व्हाएसआर कंपनीच्या मालकाचा मुलगा रोहित सिंगच्या राजस्थानमध्ये पार पडलेल्या लग्नात आपण गेला होतात का? गेला असालच तर त्या लग्नात इतर कोण नेते होते आणि कुठल्या पक्षाचे होते? हे तुम्हाला माहीतच असेल ते आपण लोकांना सांगावे. तुम्ही स्वार्थी आहात की अजितदादा प्रेमी आहात? हे महाराष्ट्राला दाखवून द्या, उद्या पत्रकार परिषद घेऊन याबाबत स्पष्टीकरण द्याल, ही अपेक्षा, असं रोहित पवार यांनी म्हटलं आहे.

# मंत्री पंकजा मुंडे यांना न्यायालयाची नोटीस

## निधी वाटपाबाबत गंभीर प्रश्न उपस्थित



जालना (वृत्तसंस्था)

जालना जिल्हा नियोजन समितीच्या बेकायदेशीर स्थापनेबाबत मुंबई उच्च न्यायालयाने मंत्री पंकजा मुंडे यांना नोटीस बजावली आहे. निधी वाटपाबाबतही गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहे. अशी माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार महाराष्ट्र सरकारमधील मंत्री आणि जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाकडून एक महत्त्वाची कायदेशीर नोटीस मिळाल्यानंतर राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. राज्य सरकारने स्थापन केलेल्या जालना जिल्हा नियोजन समिती (डीपीसी) स्थापनेच्या कायदेशीरतेशी हा विषय संबंधित आहे. या समितीच्या रचनेवर आणि तिच्या निधी वाटपावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणाऱ्या याचिकेची न्यायालयाने गंभीर दखल घेतली आणि पंकजा मुंडे आणि संबंधित सरकारी अधिकाऱ्यांकडून उत्तरेस्थानिक सामाजिक कार्यकर्ते भाऊसाहेब गोरे यांनी दाखल केलेल्या रिट याचिकेवर सुनावणी करताना, न्यायमूर्ती विभा कंकणवाडी आणि हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठाने हा आदेश दिला. जिल्हा नियोजन समिती कायदेशीर तरतुदींचे उल्लंघन करून स्थापन करण्यात आली आहे, ज्यामुळे विकास कामांसाठी वाटप केलेल्या निधीची कायदेशीरता धोक्यात आली आहे, असा याचिकाकर्त्याचा आरोप आहे. पंकजा मुंडे स्वतः जिल्ह्याच्या प्रभारी मंत्री म्हणून काम करत असल्याने ही परिस्थिती सरकारसाठी लाजिरवाणी आहे.याचिकाकर्त्याच्या वकिलाने मुंबई उच्च न्यायालयात युक्तिवाद केला की जालना जिल्हा नियोजन समितीची सध्याची रचना कायदेशीररित्या सदोष आहे. बेकायदेशीर स्थापनेमुळे समितीचे आर्थिक निर्णय आणि निधी वाटप देखील संशयास्पद आहे, असा याचिकेत दावा करण्यात आला आहे. विकास कामांसाठी राखीव ठेवलेला निधी ज्या उद्देशांसाठी वाटप करण्यात आला होता त्यासाठी वापरला जात नसल्याचा आरोप याचिकाकर्त्याचा आहे.

# ऊर्जा सुरक्षेत भारत मजबूत; ४० देशांकडून तेल खरेदी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

अमेरिका-इस्त्रायल आणि इराण युद्धादरम्यान भारताला कच्च्या तेलाची कमतरता भासणार नाही. भारताकडे सध्या कच्च्या तेलाचा आणि रिफाइंड पेट्रोलियम उत्पादनांचा २५ कोटी बॅरल (सुमारे ४ हजार कोटी लिटर) पेक्षा जास्त साठा आहे.सरकारच्या अहवालानुसार, हा बॅकअप इतका आहे की, जर पुरवठा पूर्णपणे थांबला तरी, देशाची संपूर्ण पुरवठा साखळी ७ ते ८ आठवडे सहज चालू शकते. म्हणजेच, येत्या काळात पेट्रोल-डिझेल आणि इतर पेट्रोलियम उत्पादनांच्या कमतरतेची कोणतीही चिंता नाही.

भारताकडे केवळ २५ दिवसांचा साठा शिल्लक आहे,असा माध्यमातून केलेला दावा केंद्र सरकारने फेटाळून लावला आहे. भारताची ऊर्जा सुरक्षा आता कोणत्याही एका मार्गावर किंवा देशावर अवलंबून नाही. भारताची ऊर्जा खरेदी पूर्णपणे 'राष्ट्रहिता'वर आधारित आहे. गेल्या १० वर्षांत भारताने आपल्या तेल खरेदीचा आवाका लक्षणीयरीत्या वाढवला आहे.



एक दशकापूर्वी भारत केवळ २७ देशांकडून तेल खरेदी करत होता, जी संख्या आता ४० झाली आहे. जागतिक स्तरावरील तणावामुळेही भारताने आपल्या गरजांसाठी नवीन मार्ग शोधले आहेत.

जगातील सर्वात संवेदनशील सागरी मार्गांपैकी एक असलेल्या 'स्ट्रेट ऑफ होर्मुज'बद्दल अनेकदा चिंता व्यक्त केली जाते, परंतु भारताने आपली रणनीती बदलली आहे. आता भारताचे केवळ ४० टक्के कच्चे तेल या मार्गाने येते.उर्वरित ६० टक्के तेल रशिया, पश्चिम आफ्रिका, अमेरिका आणि मध्य आशियासारख्या पर्यायी मार्गांनी येते. अहवालानुसार,भारताची ऊर्जा सुरक्षा एकाच सागरी मार्गावर अवलंबून होती, ते दिवस आता राहिले नाहीत.

इराण विरुद्ध इस्त्रायल-अमेरिका युद्धामुळे राज्यात इंधन तुटवडा निर्माण झाल्याचा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फेटाळून लावला. राज्यात कुठेही इंधनाचा तुटवडा नाही. त्यामुळे पेट्रोल पंपांवर विनाकारण मोठ्या रांगा लागल्या आहेत, असे ते म्हणाले. प्रत्यक्षात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात सरकार भविष्यातील स्थितीचा सामना करण्यास सक्षम आहे, असे ते म्हणाले. मुख्यमंत्री म्हणाले, लोकांना चुकीची माहिती देऊन पॅनिक तयार करण्याची गरज नाही. केंद्र सरकारने यासंदर्भातील आपली भूमिका अत्यंत स्पष्टपणे मांडली आहे. भारताच्या ऊर्जा सुरक्षेसंबंधी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कशाप्रकारे पाऊले उचलली हे आपल्यासमोर आले आहे. सध्या राज्यात कुठेही इंधन टंचाई नाही. काही माध्यमांनी दोन-तीन दिवस झाले पेट्रोल - डिझेलचा तुटवडा निर्माण होणार असल्याच्या बातम्या दिल्या. यामुळे पेट्रोल पंपांवर विनाकारण मोठमोठ्या रांगा लागल्या. असा कोणताही तुटवडा नाही. केंद्र सरकारनेही हे स्पष्ट केले आहे. भविष्यात जी परिस्थिती उद्भवेल, त्याचा सामना करण्यासाठी भारत सरकार मोदींच्या नेतृत्वा सक्षमपणे भक्कम परिस्थितीत आहे

संगमनेरकरांनी गौरविलेले
॥जय श्रीराम॥
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

मणके विकार, गुडघेविकार, अस्थिविकार
सुरक्षित, खात्रिशीर व परीपूर्ण उपचारासाठी आजच भेटा
डॉ. सुभाष दत्तात्रय मंडलिक
मणके विकार, गुडघेविकार
व अस्थिविकार चिकीत्सक
(२४ वर्षांचा प्रदिर्घ अनुभव)
मंदना मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
लक्ष्मी नगर, रहाणे मळा, संगमनेर
संपर्क - ९८२२७०९०३०

जिथे काळजी आणि
उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
● मेडिसिन ● सर्जरी
● स्त्रीरोग – प्रसुति
● मुळव्याध–भगंदर–फिशर
● लेझर सेंटर
डॉ. ताम्हाणे विशाल वसंत
(M.S.) शल्य
कन्सल्टंट जनरल व लेझर सर्जन
डॉ. ताम्हाणे रुपाली विशाल
स्त्रीरोग / प्रसुती चिकित्सक
इंदिरा नगर, गल्ली नं. १०, संगमनेर
: Help Line :
7219 100 100

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com



## अंगणवाडी सेविकांना ग्रॅज्युइटी व निवृत्तीवेतनाच्या निर्णयाची प्रतीक्षा



मुंबई (युवावार्ता प्रतिनिधी)-

राज्यात दोन लाखांवर अंगणवाडी सेविका आणि मदतनीस असून त्यांना पावणे दोन लाखांपर्यंत सेवा उपदान (ग्रज्युइटी) तसेच निवृत्तीवेतन देण्याबाबतचा निर्णय २०२४ ला सर्वोच्च न्यायालयाकडून देण्यात आला. राज्य सरकारच्या पातळीवर त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. मात्र, सरकारी पातळीवर याबाबत विचारविनिमय सुरू असून या निर्णयाची अंमलबजावणी लवकरच होण्याची शक्यता आहे.

सेवानिवृत्त अंगणवाडी कर्मचाऱ्यांना दरमाह निवृत्तीवेतन व उपदान देण्याबाबतचा प्रस्ताव वित्तविभागाकडे सादर करण्यात आला आहे. त्यावर शासनस्तरावर विचारविनिमय सुरू असून त्याबाबत अद्याप निर्णय घेण्यात आलेला नसल्याबाबत विधान परिषदेत प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्याचप्रमाणे अंगणवाडी सेविका व मदनतीस यांच्याकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या अंमलबजावणीसाठी अतिरिक्त काम करून घेऊनही मानधन न दिल्याबाबतच्या अंगणवाडी सेविकांच्या तक्रारी असल्याची बाब आमदार राजेश राडोड, सत्यजित तांबे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे मांडली.

यावर महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिलेल्या उत्तरात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत अर्ज भरण्यासाठी प्राधिकृत करण्यात अलेल्या अंगणवाडी सेविका/अंगणवाडी पर्यवेक्षिका यांनी भरलेल्या अर्जांपैकी पात्र लाभार्थ्यांच्या नोंदीनुसार प्रोत्साहन भत्ता अदा करण्यासाठी आयुक्त, महिला व बालविकास पुणे यांना निधी वितरीत करण्यात आला असून त्यानुसार पोत्साहन भत्ता अदा करण्यात आल्याचे स्पष्ट केले.

त्याचप्रमाणे अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युईटी व निवृत्तीवेतन योजना लागू करण्याबाबतच्या प्रस्तावावर विचारविनिमय सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मानधनाव्यतिरिक्त कामाच्या आधारावर प्रतिमाह अनुक्रमे २००० रुपये व १००० रुपये प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात येत असून, पोषण अभियानांतर्गतदेखील अंगणवाडी सेविकांस ५०० रुपये प्रोत्साहन भत्ता देण्यात येत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## ‘ महा क्राईम ओएस एआय ’ मुळे गुन्हे तपास होणार अचूक व जलद

नागपूर (प्रतिनिधी)-

गंभीर गुन्ह्यांच्या तपासासाठी आता महाराष्ट्र पोलिसांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साथ मिळणार आहे. आयटी क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी मायक्रोसॉफ्ट ने विकसित केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ‘महा क्राईम ओएस एआय’ या प्लॅटफॉर्मचा प्रायोगिक वापर सध्या नागपूर ग्रामीण पोलीस दलाकडून करण्यात येत असून, या प्रयोगाला सकारात्मक यश मिळाल्याची माहिती समोर आली आहे.

या अत्याधुनिक प्रणालीमुळे तपासी अधिकाऱ्यांना गुन्ह्याच्या तपासात टप्प्याटप्प्याने मार्गदर्शन मिळत असून, तपासातील त्रुटी कमी होण्यास मदत होत आहे. नागपूर ग्रामीण पोलीस दलात सुरू असलेल्या या प्रयोगादरम्यान आतापर्यंत ३०० हून अधिक गुन्ह्यांच्या तपासात या तंत्रज्ञानाने पोलिसांना मदत केली आहे. त्यामुळे गुन्हा नोंदवल्यानंतर तपासाची प्रक्रिया अधिक वेगवान आणि अचूक होणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात येत आहे. ‘महा क्राईम ओएस एआय’ या प्लॅटफॉर्ममध्ये पोलिसांनी नोंदवलेली एफआयआर टाकल्यानंतर संबंधित गुन्ह्याच्या तपासासाठी सविस्तर आराखडा तयार होतो. तपासी अधिकाऱ्यांनी पुढे कोणती पावले उचलावीत, कोणत्या पुराव्यांची तपासणी करावी तसेच कोणती प्रक्रिया पार पाडावी, याबाबत कृत्रिम बुद्धिमत्ता मार्गदर्शन करते. यामुळे तपास अधिक शिस्तबद्ध व पुराव्यावर आधारित होण्यास मदत होते. तसेच संशयितांच्या मोबाईल क्रमांकांचे कॉल डिटेल रेकॉर्ड (सीडीआर) मिळवणे, त्याचे विश्लेषण करणे तसेच तपासासाठी लागणारी अधिकृत पत्रे तयार करणे यासारखी कामेही ही प्रणाली अत्यंत कमी वेळेत पूर्ण करते.

या प्लॅटफॉर्मद्वारे सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण आणि फेस रिकग्निशन तंत्रज्ञानाचाही वापर करता येतो. त्यामुळे गुन्ह्यातील संशयित व्यक्तींचा शोध घेणे अधिक सोपे होणार आहे. सध्या नागपूर ग्रामीण पोलीस दलातील १३३ अधिकाऱ्यांना या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यात आले असून, गेल्या काही आठवड्यांपासून त्याचा वापर सुरू आहे. डिसेंबर २०२५ मध्ये सत्य नडेला यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना या तंत्रज्ञानाबाबत माहिती दिली होती. त्यानंतर राज्याच्या गृह विभागासोबत सामंजस्य करार करण्यात आला.

नागपूर ग्रामीणमधील प्रयोग यशस्वी ठरल्यानंतर लवकरच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांतील पोलीस ठाण्यांमध्ये ‘महा क्राईम ओएस एआय’ लागू करण्याची शिफारस करण्यात आली आहे. नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दार यांनीही या तंत्रज्ञानामुळे गुन्हे तपास अधिक प्रभावी आणि परिणामकारक होणार असल्याचे सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या या वापरामुळे महाराष्ट्र पोलिसांच्या तपास प्रक्रियेला मोठी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## ऋतुजा गायकवाड ,धनंजय दिघे यांचे यूपीएससी परीक्षेतील यश तरुणांसाठी स्फूर्तीदायी - माजी मंत्री बाळासाहेब थोरात





संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)-

जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कष्ट चांगले माहीत असतात. ऋतुजा गायकवाड यांनी आयएएस, धनंजय दिघे यांनी आयपीएस तर विश्वनाथ सांगळे यांनी एमपीएससी परीक्षेत मिळवलेले यश हे तालुक्यातील विद्यार्थ्यांसाठी स्फूर्तीदायी असून या विद्यार्थ्यांनी तालुक्याचा लौकिक वाढवले असल्याचे गौरवोद्गार माजी शिक्षण मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले आहेत.

तिरंगा चौक येथे यूपीएससी परीक्षेत १०६ व्या रँकने आयएएस झाल्याबद्दल ऋतुजा गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. तर जोर्वे येथील धनंजय संजय दिघे आयपीएस झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. तर सोनेवाडी येथे विश्वनाथ लहानू सांगळे पीएसआय झाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्री थोरात, अशोकराव गायकवाड, संगीता गायकवाड, उत्तमराव गायकवाड, बाजीराव गायकवाड, संजय दिघे, लक्ष्मण गायकवाड, बाबासाहेब गायकवाड, प्रा. गुलाबराव गायकवाड, सखाराम माळी, माधव हसे, शिवाजी दुर्शिंग, अण्णा कांदळकर, रामनाथ कारले, प्रा. मनीषा तुपे आदींसह जोर्वे येथील व सोनेवाडी येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, तालुक्यातील ३ मुलांनी मोठे यश मिळवले आहे. ऋतुजा गायकवाड, धनंजय दिघे आणि विश्वनाथ लहानू सांगळे हे सर्व विद्यार्थी जिल्हा परिषदेच्या शाळेचे विद्यार्थी आहेत. जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना स्वतःच्या अडचणी स्वतः सोडवायची सवय असते. ते अडचणीमधून मार्ग काढतात, कारण ग्रामीण शिक्षण हे त्यांच्यासाठी विद्यापीठ सारखे आहे.

या विद्यार्थ्यांनी मिळवलेली यश हे तालुक्यातील नवीन पिढीसाठी प्रेरणादायी असून इतर सर्व विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुकरण करावे. याचबरोबर या विद्यार्थ्यांच्या पाठीशी त्यांचे कुटुंबीय मार्गदर्शक म्हणून उभे राहिली आणि त्यामुळे यांनी यश मिळवले. यश मोठे आहे, कामही मोठे आहे. आगामी काळात प्रामाणिकपणा, कायद्याचे ज्ञान घेऊन निर्णयक्षमता वाढवत प्रलोभने टाळावी व तालुक्याचा लौकिक वाढवावा, असे आवाहन त्यांनी नवनिर्वाचित अधिकाऱ्यांना केले.

डॉ. सुधीर तांबे म्हणाले की, यूपीएससी, एमपीएससी या परीक्षा अवघड आहेत. स्पर्धा मोठी आहे. परंतु एकाग्रतेने आणि निष्ठा ठेवून काम केल्याने यश मिळते. संगमनेर तालुक्यामध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणाची चांगली संस्कृती असून त्याचा लाभ नवीन पिढीला होत आहे. तर डॉ. जयश्रीताई थोरात म्हणाल्या की, मुलींच्या पाठीशी शिक्षणाकरता आई-वडिलांनी ठाम उभे राहिले पाहिजे. मुली सुद्धा वेगवेगळ्या क्षेत्रात अत्यंत यशस्वीपणे काम करत आहे. ऋतुजा हिने मिळवलेले यश हे मुलींसाठी प्रेरणादायी असून जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने तालुक्यातील महिलांसाठी ही भेट दिली आहे. याप्रसंगी आयएएस ऋतुजा गायकवाड, आयपीएस धनंजय दिघे आणि पीएसआय विश्वनाथ सांगळे यांनी आपली मनोगते व्यक्त केली. सर्व ग्रामस्थांनी या अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे. सोनेवाडी व जोर्वे येथे भव्य मिरवणूक काढण्यात आली. तर नानज दुमाला व संगमनेर येथे तिरंगा चौकामध्येही ऋतुजा गायकवाडचा भव्य सत्कार करण्यात आला.

## खांडगाव शाळेतील विद्यार्थ्यांचा कवी आव्हाड यांच्याशी संवाद



संगमनेर (प्रतिनिधी)-

प्रत्यक्ष अनुभूतीतून अध्ययन चिरकाल होते. या उक्तीप्रमाणे इ. २ रीच्या भाषा विषयातील ’चांदोबाच्या देशात’ या कवितेचे कवी व बालसाहित्यिक एकनाथ आव्हाड सर यांनी गुगल मीट द्वारे खांडगाव शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. स्वप्नात ते चांदोबाच्या देशात गेले कसे आणि त्यातून कवितेची निर्मिती कशी झाली, हे त्यांनी सुंदर सांगितले. त्यांनी ती कविता विद्यार्थ्यांना गाऊन दाखवली.

आपल्या हलक्या-फुलक्या शैलीत त्यांनी लेखकांचे भावविश्व उलगडून सांगितले. कविता लेखनाची सुरुवात कशी केली पाहिजे, त्यासाठी काय आवश्यक आहे, याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना त्यांनी केले. ’चांदोबाच्या देशात’ कवितेविषयी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना त्यांनी अतिशय सुंदर, मार्मिक उत्तरे दिली. लेखक व कवी होण्यासाठी काय केले पाहिजे, हे विद्यार्थ्यांना साध्या, सोप्या भाषेत समजावून सांगितले. खूप मोठी स्वप्न पहा आणि ते पूर्ण करण्यासाठी धडपड करा. नेहमी सर्जनशील रहा, नाविन्याचा ध्यास घ्या. वाढदिवसानिमित्त शाळेला, मित्रांना पुस्तक भेट द्या, ते वाचा, त्यावर चर्चा करा, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या समवेत गप्पा मारताना पाऊण तास विद्यार्थी मंत्रमुग्ध होऊन गेले. हा अनुभव त्यांच्यासाठी चिरकाल असेल.

संवाद यशस्वी होण्यासाठी मुख्याध्यापक दादाभाऊ चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षकवृंदांनी प्रयत्न केले. या स्तुत्य उपक्रमाबद्दल गटशिक्षणाधिकारी बाळासाहेब गुंड, शिक्षण विस्तार अधिकारी मंगला कलगुंडे, केंद्रप्रमुख रवींद्र अनाप, विविध शालेय समितीच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य, पदाधिकारी, पालक यांनी अभिनंदन केले. आनंद व्यक्त केला.

प्रत्यक्ष पाठ्यपुस्तकातील लेखकांशी संवाद या उपक्रमातून विद्यार्थ्यांचे भावविश्व अधिक समृद्ध होते. त्यांच्या सर्वांगीण विकासाला मदत होते. या उपक्रमातून खांडगाव शाळेतील विद्यार्थी भावी लेखक, वैज्ञानिक व्हावे, हे उद्दिष्ट असते. हा नावीन्यपूर्ण उपक्रम शाळेत सुरू ठेवल्याबद्दल सर्व शिक्षकवृंदांचे मनःपूर्वक अभिनंदन.

रायभान गुंजाळ, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, खांडगाव.

# नाथ षष्ठीचा महिमा आणि संत एकनाथ महाराजांचे कार्य

संत एकनाथ महाराजांच्या जीवनामध्ये फाल्गुन वद्य षष्ठीला फार मोठे महत्त्व आहे. या तिथीला पाच अत्यंत महत्त्वाच्या घटना घडल्या. १) एकनाथ महाराजांचे गुरु जनार्दन स्वामी यांचा जन्म, २) जनार्दन स्वामींना दत्त दर्शन, ३) जनार्दन स्वामींचा नाथांवर अनुग्रह, ४) जनार्दन स्वामींचे देहावसन, ५) एकनाथ महाराजांचे देहावसन. पैठणला हा षष्ठीचा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होतो. एकनाथ महाराजांनी प्रथम आपल्या गुरूच्या पुण्यतिथीचा दिवस म्हणून उत्सव करण्यास सुरुवात केली होती. पुढे मग एकनाथांच्या भक्तांनी त्यांची ही पुण्यतिथी म्हणून तो उत्सव पुढे चालू ठेवला. प्रपंच आणि परमार्थ यांचा उत्तम मेळ संत एकनाथांनी घातला. संत एकनाथ महाराज खऱ्या अर्थाने लोकशिक्षकच होते. डॉक्टर यशवंत पाठक यांनी लोकशिक्षकाचा अर्थ खूप छान सांगितला. समाज सुधारणेला शुचीतेच्या अधिष्ठानावरून सामाजिक नीतिमत्ता शिकवणे म्हणजे लोकशिक्षक. या अर्थाने संत एकनाथ महाराज लोकशिक्षक होते. अत्यंत स्वच्छ चारित्र्य, स्वच्छ वर्तन. शत्रू सुद्धा त्यांना चांगले म्हणतील असे संत एकनाथ महाराज. त्यांना शांती ब्रह्म असे म्हणतात.

संत एकनाथांच्या भक्तीभावाने, भक्ती प्रेमामुळे, त्यांच्या अध्यात्मिक उंचीमुळे प्रत्यक्ष भगवंत त्यांच्या घरी पाणी कावडीने वाहत होते. सर्वसामान्य माणसाला असलेले विकार, चंचलता, वासना, भौतिकता हा कोष सोडून, संकुचित वृत्ती सोडून व्यापक वृत्ती शोधण्यासाठी त्यांनी अभ्यास सुरू केला. ज्यांच्या अंगात आंतरिक तळमळ ही प्रामाणिक असते, त्यांना गुरु भेटतो. संत एकनाथांनाही जनार्दन स्वामींचे दर्शन झाले आणि जनार्दन स्वामी हे त्यांचे गुरु बनले. संत एकनाथांना शांतीचा महासागर असेही म्हणतात. त्यांच्या घरी प्रत्यक्ष भगवंत येऊन राहिले. श्री एकनाथ सदनी माधवजी सर्व काम हे करितो! स्व करे चंदन घाशी! गंगेचे पाणी कावडी भरितो! समाज जागृतीसाठी त्यांनी अभंग, गवळणी, भारुडे रचले. संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांची गीतेवरील टीका ‘ज्ञानेश्वरी’ या प्रतीचे शुद्धीकरण त्यांनी ज्ञानेश्वरी लिहिल्यानंतर जवळजवळ दोनशे पन्नास वर्षांनी केले. आळंदी येथील समाधी स्थळाचा शोध घेतला. जिर्णोद्धार केला. मूळ गाभारा बांधला. मंदिरामध्ये नित्य पूजेची व्यवस्था लावली आणि आळंदीची समाधी सोहळ्याची कार्तिकी यात्रा पुन्हा सुरू केली.

उद्धव गीता, नाथांची भागवतावर वीस हजार ओव्या दिल्या. लोकांना समजेल अशा मराठी भाषेत त्यांच्या उद्धाराकरता लिहिल्या. आनंद लहरी, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, गवळणी, भारुडे इत्यादी इतके प्रचंड लिखाण करून समाज जागृतीचे काम त्यांनी केले. एकनाथ महाराजांचे वाङ्मय हे सर्वांच्या उद्धाराकरताच लिहिलेले आहे. यामध्ये अनेक प्रकारचा उपदेश भरलेला आहे. त्यांची वाणी म्हणजे अमृत देववाणीच होती. त्यांच्या चरित्रामध्ये अनेक चमत्कार आलेले आहेत. त्यांचे अनेक कुटाळ, परंतु नंतर अनुयायी शिष्य झाले आहेत. छळ करणाऱ्यांना क्षमा करून मुक्तीचे दान त्यांनी दिले आहे. ते म्हणतात, यौवन अंगावर थुंकला! प्रसाद देऊन मुक्त केला.! अनेक ढोंगी साधूंना मार्गावर आणले. त्यांची समदृष्टी फारच वर्णन करण्यासारखी आहे. वाळवंटावर लहान बालक रडत आहे, हे बघून दयेने आपल्या कडेवर घेऊन त्याला त्याच्या आईजवळ आणून दिले. अनुभवा वाचून कोरडे शब्द उच्चारणाऱ्यांची खोड मोडली.



श्री काशी क्षेत्र हे संस्कृत विद्येचे माहेरघर. श्री काशीक्षेत्री मराठी भाषेत ओव्या रूपाने श्री भागवत ग्रंथ पूर्ण केला. तेव्हा एकनाथ महाराजांचा द्वेष करणारे त्यांचे शिष्य बनले. अनेक ज्ञानी पंडितांचा अहंकार त्यामुळे नष्ट झाला. त्यांचा मुलगा हरी पंडित हा खरोखर विद्वान होता. एकनाथ महाराजांच्या जीवनातील एक प्रसंग म्हणजे, एकदा एकनाथ महाराज यांनी संध्या केली नाही. त्यावर हरिपंडिताने त्यांना विचारले की, आपण स्नान संध्या केली की नाही. त्यावर एकनाथ महाराजांनी हरिपंडिताला सुंदर उत्तर दिले. ते म्हणाले, मृतामोहमयी माता! जातो बोधमय सुता! सुतकं द्वयं संप्राप्ते! कथं संध्या विधियते! एकनाथ महाराज हरिपंडिताला म्हणाले, मला आज दोन दोन सुतकं आहेत. एक म्हणजे, माझी मोह माया म्हणजे मोहरूपी आई मेली आहे. आणि मला बोध नावाचा मुलगा झाला आहे. त्यामुळे मी संध्या कशी करू?

हरी पंडिताने आपल्या वडिलांची आध्यात्मिक उंची ओळखली आणि तो नतमस्तक झाला. संत एकनाथ महाराज हे कालवश झाल्यावर खांद्यावरून स्मशानात नेत असताना खांदेकरी म्हणू लागले की, शेवटी आमच्याच खांद्यावर हे चालले. अशी अभिमानाची दर्पोक्ती ऐकून स्वतः एकनाथ महाराज ताटीवरून खाली उतरले आणि खांदेकरांना म्हणाले, तुम्ही आता घरी जावे. मी माझ्या पायाने जाईल. त्या वेळेला एक बाई सासरी जात होती. मार्गात प्रेत यात्रा पाहून तिला खूप अशुभ वाटले. त्यावेळेला एकनाथ महाराज उठून त्या बाईला म्हणाले, तू सासरी आनंदाने जा. आम्ही आत्ताच्या स्थितीत न जाता, आमच्या पायाने पुढे केव्हा तरी चालत जाऊ. म्हणजे तुला अशुभ भावना होणार नाही.

पुढे फाल्गुन वद्य षष्ठीला आपल्या पायाने भजन दिंडी घेऊन एकनाथ महाराज गंगेवर चालत गेले व स्नान करण्याच्या निमित्ताने गंगेत गंगास्वरूप होऊन गेले. संत एकनाथांच्या अंगी सहनशीलता, भूतदया, परोपकार, उच्च नीच बद्दल सम बुद्धी होती. प्रपंच आणि परमार्थ यांचा सुंदर समन्वय त्यांनी साधला होता. भक्तीच्या द्वारे मोक्ष प्राप्ती करून घेण्याचा सुलभ मार्ग दाखविण्याचे महान काम एकनाथांनी केले. वेदांतासारखा कठीण विषय सामान्य लोकांना नीट कळावा म्हणून त्यांनी भागवत या संस्कृत ग्रंथातील एकादश स्कंधावर सुबोध असा मराठीत भागवत हा मराठी ग्रंथ रचला. नाथ षष्ठीला सहा ते सात लाखांच्या पुढे भाविकांचा वर्ग पैठणला जमतो. फाल्गुन वद्य षष्ठी, सप्तमी, अष्टमी या तीन दिवसात हा उत्सव चालतो. या तीन दिवसात नाथांच्या पादुकांची मिरवणूक काढली जाते. भगवान श्रीकृष्ण स्वतः इथला पाण्याचा रांजण भरत होते. उत्सवाची सुरुवात रांजणाच्या पूजेने होते. प्रत्यक्ष भगवंत श्रीकृष्ण उर्फ श्रीखंडया रूप धारण करून बारा वर्षे त्याने कावडीने पाणी आणून सेवा केली. त्या स्मरणार्थ संत तुकाराम बीजेपासून पवित्र रांजनाचे पूजन केले जाते आणि गोदावरीचे पवित्र जल रांजणामध्ये भरले जाते. भाविकांनी घागरीने गोदावरीचे पवित्र जल टाकल्यावर रांजण भरले जाते. ज्याच्या घागरीने रांजण भरला जातो त्या भाविकाचा यथोचित सत्कार केला जातो. त्याचे पूजन केले जाते. खरोखर हा पैठण मधील सोहळा आपण समजून घेतला पाहिजे. आपल्या महाराष्ट्रातील सांस्कृतिक परंपरा उत्सव आपण नीट समजून घेऊन पुढील पिढीला त्याचे महत्त्व सांगितले पाहिजे.

संत एकनाथ महाराजांचे जीवन हे एकत्र करून अनंतत्वाकडे होते. एकनाथ महाराज म्हणजे सेवा, भक्ती आणि मानवी जीवनाचे अर्थपूर्ण रूप होय. नाथांनी समाजाला कर्मकांडातून बाहेर काढले. प्रपंच हाच परमार्थ, तो भक्तीने नीट समजून घेतला तर आपले आयुष्य सत्कारणी लागेल. एकनाथ महाराजांनी लाखो अनुबंधी निर्माण केले. आजही रखरखत्या उन्हामध्ये गोदावरीच्या पात्रात लाखो वारकरी संत एकनाथ महाराजांचा गजर करीत नाथ षष्ठीच्या निमित्ताने एकत्र जमतात. संत एकनाथांबद्दल लिहिण्या इतका मी मोठा नाही. तरीही एकनाथ महाराजांबद्दलची पुस्तके, संदर्भ ग्रंथ वाचून नाथ षष्ठीच्या निमित्ताने मी हा छोटा प्रयत्न केला आहे.

(एकनाथ महाराजांवरील संदर्भ ग्रंथ आणि विविध पुस्तके)

**प्रा. शशांक गंधे, संगमनेर**
**मो. ९८९०१६३६४२**

## महिला दिनानिमित्त मराठा...(पान १ वरुन)

तसेच संगमनेर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य शिवश्री के. के. देशमुख हे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. सत्कारमूर्ती सौ. नलिनी कळसकर यांनी प्राथमिक शिक्षिका म्हणून आपल्या संपूर्ण शैक्षणिक सेवेत विद्यार्थ्यांना ज्ञानदान केले आहे. तसेच पती सोमनाथ कळसकर यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यात त्यांनी नेहमीच समर्थ साथ दिली. सामान्य श्रमिक व वंचित घटकातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी या उद्देशाने त्यांनी ‘सौ. नलिनी सोमनाथ बाल विद्यालय’ची स्थापना केली. मुलींसाठी सांदिपानी आश्रमही सुरू करून गेल्या पंधरा वर्षांपासून निराश्रित व वंचित मुलींच्या राहण्याची, जेवणाची व्यवस्था करून त्यांना शिक्षणाची संधी देत प्रोत्साहन देण्याचे कार्य त्या करत आहेत. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना अनेक सन्मान व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून महिला दिनाच्या निमित्ताने मराठा नागरी सहकारी पतसंस्था, संगमनेर शाखेच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात येत आहे. हा सन्मान त्यांच्या कार्याला साजेसा असून त्यांच्या हितचिंतकांसाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगण्यात आले आहे. या कार्यक्रमास सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन पतसंस्थेचे चेअरमन विजयकुमार ठुबे, व्हाइस चेअरमन बाळासाहेब काळे, संचालक तथा शाखाध्यक्ष काशिनाथ डोंगरे, सरव्यवस्थापक अशोक वारकर व शाखाधिकारी अशोक अरगडे यांनी केले आहे.

# संपादकीय...

## भारताने इतिहास 'डिफिट' आणि 'रिपीट' केला

९ मार्च २०२६ ही तारीख भारतीय क्रिकेटच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंदली गेली. या दिवशी टी-२० विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाने न्यूझीलंडवर ९६ धावांनी दणदणीत विजय मिळवत तिसऱ्यांदा टी-२० विश्वचषकावर आपले नाव कोरले. या विजयामुळे भारताने केवळ विश्वचषक जिंकला नाही, तर क्रिकेटविश्वात एक नवा इतिहासही रचला. विशेष म्हणजे सलग दुसऱ्यांदा आणि घरच्या मैदानावर टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा पहिलाच संघ ठरला. त्यामुळेच या विजयाला इतिहास डिफिट आणि रिपीट असे म्हणणे योग्य ठरते. कारण भारताने एकाच वेळी नवे विक्रम प्रस्थापित करत आधीचा पराक्रम पुन्हा करून दाखवला. यावेळचा टी-२० विश्वचषक भारत आणि श्रीलंका येथे खेळविण्यात आला होता. स्पर्धा सुरू होण्यापूर्वीपासूनच भारतीय संघाला विजेतेपदाचा प्रबळ दावेदार मानले जात होते. कर्णधार सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी संघाला विश्वविजेता बनवण्याचा निर्धार केला होता. टी-२० क्रिकेटच्या वेगवान स्वरूपाचा विचार करून त्यांनी संतुलित आणि अष्टपैलू खेळाडूंनी भरलेला संघ उभारला. हार्दिक पांड्या, शिवम दुबे आणि अक्षर पटेल यांसारखे अष्टपैलू खेळाडू संघात असल्याने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर संघाला बळ मिळाले. त्याचबरोबर फिरकी गोलंदाज म्हणून वरुण चक्रवर्ती आणि वॉशिंग्टन सुंदर यांचा समावेश करण्यात आला, तर वेगवान गोलंदाजीत जसप्रीत बुमरा, अर्शदीप सिंग आणि मोहम्मद सिराज यांच्यावर मोठी जबाबदारी सोपविण्यात आली. संपूर्ण स्पर्धेत भारताची गोलंदाजी ही सर्वात मोठी ताकद ठरली. अनेक सामन्यांमध्ये सामना भारताच्या हातातून निसटतोय असे वाटत असतानाही गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी करत संघाला विजय मिळवून दिला. विशेषतः जसप्रीत बुमराने संपूर्ण स्पर्धेत धोकादायक गोलंदाजी करत प्रतिस्पर्धी संघांवर वर्चस्व राखले. अंतिम सामन्यातही त्याने न्यूझीलंडच्या प्रमुख फलंदाजांना बाद करत प्रतिस्पर्ध्यांच्या फलंदाजीचा कणा मोडला. त्याच्या भेदक गोलंदाजीमुळे न्यूझीलंडचा डाव कोलमडला आणि भारताच्या विजयाचा मार्ग सुकर झाला. अंतिम सामन्यातील उत्कृष्ट कामगिरीमुळे बुमराला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. न्यूझीलंडने अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी निमंत्रण दिले. भारताच्या सलामीवीरांनी या संधीचा पुरेपूर फायदा घेतला. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी आक्रमक सुरुवात करत न्यूझीलंडच्या गोलंदाजांना दबावाखाली टाकले. अभिषेक शर्माने महत्त्वपूर्ण अर्धशतक झळकावत भारताच्या डावाला भक्कम पाया दिला. संजू सॅमसनसाठी ही स्पर्धा विशेष ठरली. सुरुवातीच्या काही सामन्यांत त्याला संघाबाहेर बसावे लागले असले तरी संधी मिळाल्यावर त्याने आपल्या फलंदाजीची चमक दाखवली. अंतिम सामन्यातील त्याच्या दमदार खेळीमुळे भारताने अडीचशेच्या आसपास धावांचा मजबूत डोंगर उभा केला. संपूर्ण स्पर्धेत भारतीय संघाने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. क्षेत्ररक्षणात खेळाडूंनी झेल टिपणे, धावबाद करणे आणि मैदानावर वेगाने हालचाल करणे अशा बाबतीत उच्च दर्जाचे कौशल्य दाखवले. त्यामुळे प्रतिस्पर्धी संघांवर सातत्याने दबाव राहिला. कर्णधार सूर्यकुमार यादवने संघाचे नेतृत्व अत्यंत कुशलतेने केले. मैदानावरील निर्णय, गोलंदाजांची योग्य निवड आणि आक्रमक रणनीती यामुळे भारतीय संघाला विजयाचा मार्ग खुला झाला. या विजयामागे प्रशिक्षक गौतम गंभीर आणि त्यांच्या सहाय्यक प्रशिक्षकांच्या संघाचेही मोठे योगदान आहे. खेळाडूंना योग्य मार्गदर्शन, रणनीती आखणे आणि मानसिकदृष्ट्या सक्षम बनवणे या बाबतीत प्रशिक्षकांनी मोठी भूमिका बजावली. संघातील प्रत्येक खेळाडूने आपली जबाबदारी पार पाडल्यामुळेच भारताला हा ऐतिहासिक विजय मिळवता आला. भारतीय संघाचे हे विजेतेपद विशेष आहे कारण टी-२० विश्वचषकात भारताने तिसऱ्यांदा विजय मिळवला आहे. २००७ साली महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली भारताने पाकिस्तानला हरवून पहिल्यांदा टी-२० विश्वचषक जिंकला होता. त्यानंतर २०२४ साली रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली दक्षिण आफ्रिकेला पराभूत करत भारताने दुसऱ्यांदा हा किताब पटकावला. आता २०२६ मध्ये सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली भारताने तिसऱ्यांदा हा पराक्रम करून दाखवला. त्यामुळे तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकणारा भारत हा जगातील पहिला देश ठरला.






# अमृतवाहिनी बँकेच्या वतीने महिला दिनानिमित्त शून्य बॅलन्स वर खाते सुरू



संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- तालुक्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेची कामधेनू असणाऱ्या अमृतवाहिनी बँकेने ११०० कोटींचा टप्पा गाठला असून, जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने तालुक्यातील महिला भगिनींचे शून्य बॅलन्सवर खाते उघडण्यात येणार असून एटीएमवर दोन लाखांचा विमा दिला जाणार आहे. सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित एकविरा फाउंडेशनच्या क्रिकेट स्पर्धेत अमृतवाहिनी बँकेने महिलांसाठी ही विशेष योजना सुरू केली आहे.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, नगराध्यक्ष डॉ. मैथिली तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात, व्हाईस चेअरमन नानासाहेब शिंदे, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, मा. जि. प. सदस्य रामहरी कातोरे यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. जयश्री थोरात यांच्या संकल्पनेतून सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे महिलांसाठी क्रिकेट, रस्सीखेच व बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात आला असून या स्पर्धांमधून ४५०० महिला व युवतीने सहभाग घेतला आहे.

तालुक्यातील महिला व युवतीने विविध क्षेत्रात मोठी प्रगती केली असून हे सर्वांसाठी अभिमानास्पद असल्याचे माजी मंत्री थोरात यांनी म्हटले असून, महिला दिनाच्या निमित्ताने अमृतवाहिनी बँकेच्या वतीने शून्य बॅलन्सवर महिलांचे खाते उघडण्यात येणार असून एटीएमवर दोन लाखांचा विमा असणार आहे. यासाठी प्रत्येक महिलेने आपले आधार कार्ड, पॅन कार्ड व दोन फोटो घेऊन एकविराच्या सुरू असलेल्या क्रीडा महोत्सवात स्टेडियममध्ये उभारण्यात आलेल्या अमृतवाहिनी बँकेच्या स्टॉलमध्ये जमा करावे व बँकेचे खाते खोलावे, असे आवाहन चेअरमन सुधाकर जोशी यांनी केले आहे. तरी या उपक्रमाचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा, असे आवाहन एकविरा फाउंडेशन व सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सहकारी बँकेच्या वतीने करण्यात आली आहे.

**सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) अहिल्यानगर**
**अहिल्यानगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या., अहिल्यानगर.**
**श्री रोकडेश्वर ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्यादित, आंबीदुमाला, ता. संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर.**

**जाहिर नोटीस**

| क्र. | कर्जदार / जामिनदाराचे नाव | अर्ज क्र. | दावा रक्कम |
|---|---|---|---|
| १ | कर्जदार - पटेल वजीर बाबुभाई<br>जामिनदार रोहिदास नाथा सरोदे<br>जामिनदार - सुनिल शिवाजी नरवडे | १६६९ | ९,४२,७९२ |
| २ | कर्जदार संदिप सोपान फापाळे<br>जामिनदार - निवृत्ती सदाशिव फापाळे<br>जामिनदार - देवानंद बाजीराव सरोदे | १६६८ | २,३१,८४१ |
| ३ | कर्जदार संगिता प्रकाश नरवडे<br>जामिनदार - माधव अर्जुन ढेरंगे<br>जामिनदार- छाया जयसिंग नाईकवाडी<br>जामिनदार-वैभव लक्ष्मण आरोटे | १६६७ | २,०३,७४५ |
| ४ | कर्जदार देवानंद बाजीराव सरोदे<br>संमतीदार - भास्कर बाजीराव सरोदे<br>संमतीदार- रत्नाकर बाजीराव सरोदे<br>संमतीदार - अरुणा गंगाधर त्रिभुवन<br>संमतीदार - मालतीबाई बाजीराव सरोदे<br>जामिनदार-दिनकर भिवा नरवडे<br>जामिनदार-अमोल निवृत्ती नरवडे | १६६६ | १,३८,९१९ |

सदर दाखल्यांचे कामी अर्जदार यांनी सादर केलेल्या अर्जातील प्रतीवादींना रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठविण्यात आलेले आहे. परंतु वरील प्रतिवादी यांना नोटीस रुजू न झाल्याने त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे व प्रथम सुनावणीस उपस्थित न राहिल्याने सदरचे जाहीर नोटीस देत आहोत.

उपनिर्दीष्ठ अर्जासंबधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने दिनांक १७/०३/२०२६ रोजी सकाळी / दुपारी ०१.०० वाजता दाव्या संबधी कागदपत्रासह आपण सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा) अहिल्यानगर. अहिल्यानगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्यादित अहिल्यानगर. यांचे कार्यालय दुसरा मजला, व्यापारी संकुल, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, ता. जिल्हा अहिल्यानगर. ४१४००१ या कार्यालयात उपस्थित रहावे. या नोटीसी व्दारे वरील प्रतिवादींना असे कळविण्यात येते की वरील तारखेस आपण सुनावणीस वेळेवर हजर न राहील्यास आपल्या गैरहजेरीत आपल्या अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व अर्जदार संस्थेने मागणी केल्याप्रमाणे वसुली दाखला अर्जदारसंस्थेस देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यांस कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल म्हणून आज दिनांक ०४/०३/२०२६ रोजी माझी सही कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर नोटीस दिले आहेत.

स्थळ- अ.नगर
दिनांक -

**(डॉ. अंजली वाघमारे)**
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा)
अहिल्यानगर जिल्हा पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या., अहिल्यानगर

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहमगदनगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ सेतु/ जन्म नोंद/५१६/२०२६ दिनांक - २५/०२/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार श्रीमती. चंदाबाई दिगंबर काळे, रा. शेंडेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांनी दिनांक २०/०१/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे रा. शेंडेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथील रहिवासी असून अर्जदार यांचे स्वतः नामे चंदाबाई दिगंबर काळे यांचा जन्म मौजे शेंडेवाडी, ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे दिनांक १३/०२/१९७० रोजी झाला असून त्यांची जन्म नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी शेंडेवाडी, यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे.

तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी शेंडेवाडी, यांचे कार्यालयाचे नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**


**पाहिजेत**
अनुभवी व गरजू
साईट सुपरवायझर
साईट इंजिनियर
१ ते २ वर्षांचा अनुभव आवश्यक
चिंतामणी डेव्हलपर्स, संगमनेर
7741057560

**बौद्ध वधू पाहिजे**
वर वय ३७, प्रोफेसर, गोरा, उंच आकर्षक व्यक्तीमत्व, घटस्फोटीत (अपत्य नाही)
अपेक्षा - अविवाहित वधुला प्राधान्य, विवाहित (अपत्य नसलेली) गृहिणी धार्मिक शाकाहारी, जातीची अट नाही.
अनुरूप पाहिजे
9922221693
घुलेवाडी, ता. संगमनेर

**पाहिजेत**
कन्स्ट्रक्शन सुपरवाईजर
डिप्लोमा/ डिग्री इंजिनिअर
अनुभवास प्राधान्य
संपर्क - करवा एजन्सीज बस स्टँड मागे, संगमनेर
9422762700

**पाहिजेत**
मुलगा/ पुरुष कर्मचारी
आकर्षक पगार
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल नवीन नगर रोड संगमनेर
Biodata सह भेटणे
9822283079

**पाहिजेत**
वेल्डिंग कामासाठी कामगार पाहिजेत
वेल्डर
हेल्पर
7972963397

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
MANGALA WAMAN DANGE
TO NEW NAME AS
MANGAL DASHRATH POKHARKAR
ADD – SHIVAJI NAGAR, RUSHIKESH NIWAS, GALLI NO 4, SANGAMNER, TAL - SANGAMNER, DIST -AHMEDNAGAR

**CHANGE IN NAME**
I HAVE CHANGED MY OLD NAME
SWAPNIL DATTATRAYA MAID
TO NEW NAME AS
SWAPNIL DATTATRAY MAID
BY AFFIDAVIT NO- 310/2026
DATE 06/03/2026

**धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल**
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा: मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

**जाहिरात छोटी सुवर्णसंधी मोठी**

त्वरीत पाहिजेत
सेल्सपर्सन ०६ जागा
(अनुभवी पुरुष / महिला) आकर्षक पगार व सवलती
संपर्क - 75882 49849, 9860444881
जानकीराम गंगाधर काजळे (ज्वेलर्स)
मेनरोड, राजेंद्र क्लॉथ समोर, संगमनेर, ०२४२५, ७५८८२४९८४९

सिद्धार्थ एंटरप्राईजेस, संगमनेर, कॅनरा बँकेजवळ, नवीन नगर रोड,
पेपर डिलिंग कंपनी करिता खालील जागा भरणे आहे
सेल्स एक्झीक्युटिव -१ (एमबीए असल्यास प्राधान्य)
ऑफिस असिस्टंट -१ (कॉम्पुटरचे ज्ञान आवश्यक)
कार ड्रायव्हर - १ (अनुभव असल्यास प्राधान्य)
घरकाम करणारी महिला- १ (सर्व घरकाम)
अर्जासह समक्ष भेटावे
संपर्क - 9822399371/ 7879708888

पाहिजेत सह्याद्री ॲग्रोव्हेट कंपनीसाठी
मशीन ऑपरेटर/ हेल्पर नेमणे आहे
वेतन - २०,००० ते २५,०००
शिक्षणाची अट नाही
२ वेळा अल्पोपहाराची सोय
PF आणि ESIC सुविधांसह
पत्ता- प्लॉट नं. ४२, औद्योगिक वसाहत, पाण्याच्या टाकी जवळ, संगमनेर, एम.आय.डी.सी.
संपर्क - 8484046463, 9527426464

**त्वरित पाहिजेत**
द्वारकादास शामकुमार
सेल्समन, कॅशियर, स्टोअर मॅनेजर, फ्लोअर मॅनेजर, हेल्पर, सिक्युरीटी
कामाची सोयीस्कर वेळ १० ते ७ | १२ ते ९
9511238422

**पाहिजेत**
हॉटेल दौलत रिफ्रेशमेंट घारगाव करिता पाहिजेत
अकौंटंट - १
कॅशियर - ४
स्टोअर किपर - २
9665022661
8329104856

**सुभाष मनाजी शहाणे ज्वेलर्सकरिता पाहिजेत**
सेल्स पर्सन - १० पदे
१ ते २ वर्षांचा ज्वेलरी/रिटेल क्षेत्रातील अनुभव
शिक्षण - १२ वी उत्तीर्ण
8237510210
9890499699

**ड्रायव्हर पाहिजे**
घरगुती ऑटोमॅटिक गाडीवर निर्व्यसनी ड्रायव्हर पाहिजे
8668269897

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०१
ॲडव्हान्स एक्सेलचे ज्ञान आवश्यक
अकाउंटंट - ०१
टॅलीचे ज्ञान आवश्यक
किमान ०१ वर्षांचा अनुभव
आकर्षक पगार
बालाजी एअर प्रोडक्ट, संगमनेर
8600828485
9511833320

**ड्रायव्हर पाहिजे**
साईकृपा एंटरप्राईजेस
पिकअप/छोटा हत्ती (लोकल वाहतुक) गाडी चालवण्यासाठी ड्रायव्हर पाहिजे
पत्ता- मालपाणी मल्टिप्लेक्स समोर, संगमनेर
9767059977

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. ॲसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**अभय ट्रेडिंग कंपनी करिता त्वरीत पाहिजे**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ०२
सेल्समन - ०२
ड्रायव्हर - ०२
दुकान काम व शोरुमसाठी - ०२ जागा
महिला कामगार - ०२
9822097904




MALPANI
अक्षयतृतीयेच्या शुभमुहूर्तावर
**मालपाणी उद्योग समूह** आयोजित
**भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा!**
रविवार, दि. १९ एप्रिल २०२६, सायं.४ वाजता | ठिकाण - मालपाणी लॉन्स, कॉलेज रोड, संगमनेर
- प्रत्येक नवविवाहित दाम्पत्याला स्टील कपाट, दिवाण-गादी व संसारोपयोगी साहित्य भेट!
- वरासाठी ड्रेस, फेटा/उपरणे व वधुसाठी साडी
- सर्वांसाठी भोजन व्यवस्था

सर्वधर्मीयांसाठी खुला व मोफत विवाह सोहळा
नोंदणीसाठी कायद्यानुसार वधूचे वय १८ वर्षे व वराचे वय २१ वर्षे असणे बंधनकारक
विवाह नोंदणी सुरु झाली आहे, त्वरित संपर्क करावा...प्रवेश मर्यादित!
संपर्क : एच.आर. विभाग, मालपाणी इंडस्ट्रीयल पार्क, अकोले रोड, संगमनेर
श्री. राहुल शेरमाळे (9960 253 607) | श्री. रविंद्र कानडे (9850 890 618)


दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर,०२४२५- २२५१२९
७६२०३८८२३०, ८३८०९५६६०४, ८८३०५०८२४४

वाचकांसाठी निवेदन- सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो, यातील कोणत्याही माहितीच्या,व्यवहाराच्या सत्यतेबाबत 'दैनिक युवावार्ता व्यवस्थापन' हमी देऊ शेत नाही, याची नोंद घ्यावी

# संगमनेरमध्ये 'पत्रकारिता व AI तंत्रज्ञान' विषयावर आधुनिक कार्यशाळा




संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)- बदलत्या काळात पत्रकारिता क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव वाढत असून, नव्या पिढीतील पत्रकार आणि फोटोग्राफर यांना अत्याधुनिक साधनांची माहिती मिळावी या उद्देशाने दैनिक युवावार्ताच्या वतीने आधुनिक तंत्रज्ञान व प्रात्यक्षिक कार्यशाळा आयोजित करण्यात आले आहे.

ही कार्यशाळा मंगळवार, दि. १० मार्च २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता संगमनेर येथील व्यापारी असोसिएशन हॉल, पडतानी कॉम्प्लेक्स येथे होणार आहे. या कार्यशाळेत प्रिंट, डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमधील बदलत्या प्रवाहांवर मार्गदर्शन केले जाणार आहे.

कार्यशाळेत दैनिक युवावार्ताचे संपादक किसन भाऊ हासे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तसेच इंजि. आनंद किसन हासे हे पत्रकारिता आणि एआय तंत्रज्ञान या विषयावर मार्गदर्शन करणार असून सुदीप किसन हासे हे एआय टूल्स आणि व्यावसायिकता या विषयावर सविस्तर माहिती देणार आहेत.

सध्याच्या डिजिटल युगात पत्रकारितेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) कशी उपयोगी पडते, विविध एआय टूल्सचा वापर कसा करावा, तसेच पत्रकारितेसोबतच व्यवसायामध्ये ती कशी वाढवावी, याबाबत या कार्यशाळेत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन केले जाणार आहे.

दरम्यान, ही कार्यशाळा अगदी वेळेवर सुरू होऊन वेळेवर समाप्त होणार असल्याची माहिती आयोजकांकडून देण्यात आली आहे. तालुक्यातील फोटोग्राफर तसेच पत्रकारितेची आवड असलेल्या तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन दैनिक युवावार्ताच्या वतीने करण्यात आले आहे.

# कै. अरुण साहेबराव कवडे सार्वजनिक वाचनालयास 'आदर्श सार्वजनिक वाचनालय' पुरस्कार



संगमनेर : संगमनेर तालुक्यातील नांदुरी दुमाला येथील कै. अरुण साहेबराव कवडे सार्वजनिक वाचनालयास साहित्य कला मंच संस्थेच्या वतीने 'आदर्श सार्वजनिक वाचनालय' पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार संगमनेर नगरपालिकेच्या नगराध्यक्षा डॉ. मैथिली तांबे व सुप्रसिद्ध कवी शशिकांत शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. वाचनालयाचे प्रतिनिधी म्हणून गावागावात वाचनालय उभे राहावे यासाठी सातत्याने कार्य करणारे वाचनालयाचे संस्थापक प्रमुख, तसेच राजहंस दूध संघाचे संचालक विलास कवडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय नवले, अध्यक्षा सुनीता घुले, डी. एम. लांडगे, ज्येष्ठ विधितज्ज्ञ ड. सुभाषराव गोडगे, ड. प्रदीप मालपाणी, कवी रमेश शिंदे, कवी डॉ. विवेक वाकचौरे, नाना गुजराथी, अनिल देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

नांदुरी दुमाला येथे सन २००० मध्ये स्थापन झालेल्या या वाचनालयामार्फत जयहिंद वाचन चळवळ गेली सव्वीस वर्षे प्रभावीपणे राबविली जात आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील २२ दैनिके, तसेच विविध साप्ताहिक, पाक्षिक आणि मासिके नियमित उपलब्ध करून दिली जातात. वाचनालयात काव्यसंग्रह, कथासंग्रह, कादंबऱ्या, चरित्र, आत्मचरित्र, तसेच विविध विषयांवरील समृद्ध ग्रंथसंपदा उपलब्ध असून वाचकांच्या ज्ञानवृद्धीसाठी आणि मनोरंजनासाठी सुविधा उपलब्ध आहेत.

स्पर्धा परीक्षा देणाऱ्या युवकांसाठी संदर्भग्रंथ उपलब्ध करून देण्यात आले असून बालवाचनालय, महिला वाचनालय आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन विभाग असे स्वतंत्र कक्षही वाचकांसाठी सुरू करण्यात आले आहेत. वाचनसंस्कृती वाढीस लागावी आणि ज्ञानाचा प्रसार व्हावा, या उद्देशाने वाचनालयाकडून विविध उपक्रम सातत्याने राबविले जात आहेत. ग्रामीण भागात वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी केलेल्या या कार्याची दखल घेत उत्कृष्ट वाचनालय पुरस्कार समितीने या वाचनालयाची निवड केली.

या पुरस्काराबद्दल राज्याचे माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, नाशिक पदवीधर मतदारसंघाचे आमदार सत्यजित तांबे, ग्रंथालय विभागाचे संचालक अशोकराव गाडेकर, रमेश शिंदे, राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख, जयहिंद चळवळ अध्यक्षा दुर्गाताई तांबे, डॉ. जयश्री थोरात, वाचनालयाचे मार्गदर्शक साहेबराव कवडे, प्रमोद देशमुख आदी मान्यवरांनी अभिनंदन करून वाचनालयाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# मानसिक स्थिरतेसाठी सहज योग महत्त्वाचा — डॉ. जंगले

## कारखाना कार्यस्थळावर सहज योग शिबिर उत्साहात



**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** मानवी मन हे अत्यंत चंचल आहे. मनामध्ये अस्थिरता निर्माण झाली की मानसिक, शारीरिक आणि भावनिक आजार सुरू होतात. म्हणून मनशांती होणे अत्यंत गरजेचे असून चांगल्या मानसिक स्थितीसाठी सहज योग महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन डॉ. निलेश जंगले यांनी केले आहे.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावरील अमृतेश्वर मंदिर येथे सहजयोग केंद्राच्या वतीने सहजयोगातून साक्षात्काराकडे हे शिबिर संपन्न झाले. यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी व्यासपीठावर माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, सहजयोग केंद्राच्या सुलभा दिघे, ॲड. शिवाजीराव दिघे, रोमानिया देशातून गेडीमिनीस मारिया, डॉ. बरखा, संजय दिघे, ललिता दिघे, लता गायकर, संदीप सातपुते, नामदेव राहणे, विश्वासराव गोरडे, वैशाली डांगे, जगन्नाथ घुगरकर, प्राचार्य विवेक धुमाळ, किरण कानवडे, प्रा. जी. बी. काळे, यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. जंगले म्हणाले की, मानवी मनात अस्थिरता निर्माण झाली आहे आणि याचा परिपाक जग हे युद्धजन्य परिस्थितीमध्ये आहे. मन शांत असेल तर विकार दूर होतात आणि याकरता सहज योग महत्त्वाचा आहे. सहज योग म्हणजे स्वत:बरोबर जन्म घेतलेला योग. भूतकाळ किंवा भविष्यकाळाचा विचार करण्यापेक्षा प्रत्येकाने वर्तमान काळाचा विचार करावा. प्रत्येक क्षणाचा आनंद घ्यावा. शरीरामध्ये निर्माण होणारी अति उष्णता ही विकारांचे कारण असून मन व आत्मशुद्धीद्वारे विकार दूर करता येतात, असे ते म्हणाले.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, योग प्राणायाम आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. परंतु त्याही पुढे सहज योगातून मनुष्याला आरोग्याबरोबर आत्मशांती मिळते आहे. या परिवाराच्या माध्यमातून जगामध्ये अनेक माणसे जोडले गेले असून सहज योगाच्या माध्यमातून होणारी मनशांतीची शिकवण अमेरिकेच्या डोनाल्ड ट्रम्प यांना दिली गेली पाहिजे. कारण आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धाचे कारण अद्याप कळत नाही. अनंत शक्तींशी व्यक्ती जोडण्याकरता सहजयोग परिवाराचे काम कौतुकास्पद असल्याचे ते म्हणाले.

तर मा. आ. डॉ. तांबे म्हणाले की, व्यक्तींच्या मानसिक स्थितीवर आजारांचे संबंध काही अर्थाने अवलंबून आहे. मन अशांततेमुळे आजार वाढत असून मन शुद्ध व निरोगी जीवनासाठी प्रत्येकाने सतर्क रहावे. चांगला आहार, व्यायाम आणि निरोगी जीवनशैली प्रत्येकाने अंगी करावे, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संदीप सातपुते यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी तर जगन्नाथ घुगरकर यांनी आभार मानले.

# एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये १० मार्चपासून 'कॉम्प्लेक्स अँजिओप्लास्टी' शिबीर

## लंडनचे प्रख्यात हृदयविकार तज्ज्ञ डॉ. सुधीर राठोरे करणार प्रक्रिया मार्गदर्शन




**नाशिक (युवावार्ता प्रतिनिधी)–** सर्वसामान्य रुग्णांना दर्जेदार आणि जागतिक दर्जाची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने एसएमबीटी हॉस्पिटल व एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटतर्फे विशेष पुढाकार घेत, येत्या ९ ते १५ मार्च २०२६ यादरम्यान 'मोफत हृदयरोग तपासणी व जटिल (कॉम्प्लेक्स) अँजिओप्लास्टी' शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात लंडन येथे कार्यरत असलेले आंतरराष्ट्रीय ख्यातीचे प्रसिद्ध इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. सुधीर राठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली जटिल अँजिओप्लास्टीसाठी मार्गदर्शन केले जाणार असल्याची माहिती एसएमबीटी हार्ट इन्स्टिट्यूटचे संचालक व वरिष्ठ हृदयविकार तज्ज्ञ डॉ. गौरव वर्मा यांनी दिली. ते म्हणाले की, हे शिबिर १० मार्च ते १५ मार्चपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत शिबिरात रुग्णांची तपासणी सुरू राहणार आहे.

डॉ. राठोरे हे १३ व १४ मार्च रोजी एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहून रुग्णांची 'जटिल अँजिओप्लास्टी' करण्यासाठी मार्गदर्शन करतील. डॉ. राठोरे हे लंडन येथील एनएचएस हॉस्पिटल येथे 'कन्सल्टंट इंटरव्हेन्शनल कार्डिओलॉजिस्ट' म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा लाभ उत्तर महाराष्ट्रातील रुग्णांना मिळणार असल्यामुळे जास्तीत जास्त रुग्णांनी या संधीचा लाभ घ्यावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

या सात दिवसीय शिबिरामध्ये हृदयाच्या रक्तवाहिन्यांवरील ॲडव्हान्स कोरोनरी इंटरव्हेन्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे. यामध्ये क्रॉनिक टोटल ऑक्लूजन (सीटीओ) अँजिओप्लास्टी, गुंतागुंतीची व जटिल अँजिओप्लास्टी, लेफ्ट मेन व बायफर्केशन अँजिओप्लास्टी, रोटेशनल ॲथरेक्टॉमी (रोटाब्लेशन), आयव्हस (आयव्हीयूएस) व रोटा ओसीटी यांसारख्या अत्याधुनिक इमेजिंग तंत्रज्ञानाचा वापर करून उपचार केले जाणार आहेत. तसेच हृदयविकाराचा धक्का बसलेल्या रुग्णांसाठी तातडीची अँजिओप्लास्टी (प्रायमरी पीसीआय) करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासोबतच छातीत दुखणे, जळजळ होणे, चालताना दम लागणे किंवा अचानक दरदरून घाम येणे यांसारखी लक्षणे आढळल्यास ती हृदयविकाराची असू शकतात. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता नागरिकांनी या शिबिरात मोफत आपली तपासणी करून घ्यावी, असे आवाहन रुग्णालयाचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर सचिन बोरसे यांनी केले. विशेष म्हणजे, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेअंतर्गत पात्र असणाऱ्या रुग्णांना या शिबिरात मोफत उपचार व शस्त्रक्रियेची सुविधा दिली जाणार असल्याचे बोरसे यांनी सांगितले. यासोबतच या शिबिराच्या अधिक माहितीसाठी हृदयविकार विभागाच्या ७७४४९१३९१३ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

हे शिबिर कोणासाठी उपयुक्त?

ज्या रुग्णांना हृदयाच्या रक्तवाहिन्यांतील ब्लॉकेजमुळे बायपास शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला आहे, परंतु बायपास करणे धोकादायक ठरू शकते किंवा ज्यांना बायपासची भीती वाटते, अशा रुग्णांसाठी हे शिबिर विशेष उपयुक्त आहे. कॅल्शियम साचल्यामुळे कडक झालेल्या रक्तवाहिन्या, रोटा, आयव्हस (आयव्हीयूएस) यांसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अँजिओप्लास्टी करण्याचा सल्ला दिलेले रुग्ण तसेच ज्या रुग्णांच्या धमनीतील ब्लॉकेज कठीण किंवा गुंतागुंतीच्या ठिकाणी आहे आणि ज्यासाठी तज्ज्ञ हृदयविकार तज्ज्ञांची आवश्यकता असते, अशा रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा.

# पी. आर. के. प्रतिष्ठानतर्फे गुणगौरव सोहळा उत्साहात

## साईनाथ साबळे, डॉ. सागर फापाळे व गोरक्षनाथ मदने पुरस्काराने सन्मानित




**संगमनेर (युवावार्ता प्रतिनिधी)–** पी.आर.के. प्रतिष्ठान, संगमनेर यांच्या वतीने राज्यस्तरीय गुणगौरव सोहळा-२०२६ उत्साहात पार पडला. रविवार, दि. ८ मार्च २०२६ रोजी के. बी. दादा देशमुख सभागृह, सह्याद्री महाविद्यालय, संगमनेर येथे हा सोहळा मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षक नेते हिरालाल पगडाल होते. प्रमुख पाहुणे म्हणून अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव संदीप घोरपडे, ह.भ.प. विजय महाराज भोईरकर, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष अजय फटांगरे, असंघटित कामगार संघटनेचे अध्यक्ष जयराम ढेरंगे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे तालुका अध्यक्ष चंद्रकांत घुले, आदिवासी नेते सखाराम गांगड, अभिनेते व शिवव्याख्याते डॉ. सागर फापाळे, ह.भ.प. सुधाकर महाराज पाटील, पी. जे. रोहम फाउंडेशनचे अध्यक्ष ड. किरण रोहम आदी मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात शिक्षक नेते हिरालाल पगडाल यांनी स्वातंत्र्यसैनिक पंढरीनाथ काकड यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, पठार भागातील ग्रामीण शेतकऱ्यांना एकत्र करून त्यांनी गांधीजींच्या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी करून घेतले. पुतळा डोंगरावरील जंगल सत्याग्रहात सहभागी होत सरकारविरोधात असहकार पुकारत त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान दिले. स्वातंत्र्यानंतर सलग वीस वर्षे ग्रामपंचायत सरपंच म्हणून काम करत त्यांनी ग्रामविकासाला चालना दिली. तसेच स्वातंत्र्यपूर्व काळात डोळसणे येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सहकार्याने व्हालंत्री स्कूल सुरू करून शिक्षणाचा प्रसार केला.

अमळनेर शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव संदीप घोरपडे यांनी पुरस्कारार्थींना मार्गदर्शन केले. संत साहित्याचे अभ्यासक व राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतांचा प्रचार-प्रसार करणारे बुलढाणा येथील ह.भ.प. सुधाकर महाराज पाटील यांनी राष्ट्रसंतांचे विचार समाजाला योग्य दिशा देणारे असल्याचे प्रतिपादन केले. यावेळी विजय महाराज भोईरकर व सीताराम राऊत यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या राज्यस्तरीय सोहळ्यात समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात आला. माजी नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांच्या हस्ते संदीप घोरपडे यांना बाळासाहेब थोरात आदर्श लोकनेता पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिनेते व शिवप्रबोधनकार डॉ. सागर फापाळे यांना डॉ. सुधीरजी तांबे धन्वंतरी पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

तसेच ह.भ.प. सुधाकर महाराज पाटील (बुलढाणा) यांना वारकरी रत्न, विजय महाराज भोईरकर (शिरूर) यांना वारकरी भूषण, मोहम्मद कैफ तांबोळी यांना आदर्श विद्यार्थी प्रतिनिधी, राजेंद्र गवांदे, रामा पोकळे, भाऊसाहेब रहाणे, दीपाली फरगडे व चित्राताई बांबेरे यांना आदर्श सरपंच, वैभव सदाकाळ, कौतिक तांबे, मंथन देसले, हनुमान सदाफळ व रमेश खेमनर यांना आदर्श शिक्षक, खंडेराव राऊत यांना आदर्श विश्वकर्मा, राधा चव्हाण यांना आदर्श व्यवस्थापक, विनोद गायकवाड यांना आदर्श तंटामुक्ती अध्यक्ष, पांडुरंग वाकचौरे व अमोल ढोले यांना आदर्श ग्रामपंचायत सदस्य, संजयकुमार शिंदे यांना आदर्श मुख्याध्यापक, मनोहर अभियेकर व साईनाथ साबळे यांना आदर्श सामाजिक कार्यकर्ता, गोरक्षनाथ मदने यांना आदर्श पत्रकार, विजय पवार यांना आदर्श आरोग्य दूत या पुरस्कारांनी गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील अभियेकर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समन्वयक संदीप काकड, गिरीश काकड व अंतोन मिसाळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

# टी-20 च्या सिंहासनावर पुन्हा भारताचा राज्याभिषेक



मोटेरा (वृत्तसंस्था)- रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली भारतीय संघाने २८ जून २०२४ रोजी टी-२० विश्वचषकाचे विजेतेपद पटकावले होते. संघाने बार्बाडोसमध्ये दक्षिण आफ्रिकेला ७ धावांनी हरवले होते. आज टीम इंडियाने टी-२० विश्वचषक जिंकण्याचा पराक्रम २०२६ मध्येही पुन्हा केला आहे. या विजयासह तीन इतिहास घडले. पहिल्यांदाच एखाद्या यजमान संघाने टी-२० विश्वचषक जिंकला. यापूर्वी कोणताही यजमान संघ या स्पर्धेत विजेता ठरला नव्हता. तसेच पहिल्यांदाच एखाद्या संघाने सलग दोन टी-२० विश्वचषक जिंकले. यापूर्वी कोणताही संघ आपले विजेतेपद राखू शकला नव्हता. त्याचबरोबर पहिल्यांदाच एखाद्या संघाने तीन वेळा टी-२० विश्वचषक जिंकले असून इतर कोणत्याही संघाने या स्पर्धेची ३ विजेतेपदे जिंकली नाहीत.

या ऐतिहासिक अंतिम सामन्याची सुरुवात भारताला विश्वविजेता बनवणाऱ्या कर्णधारांनी केली. जेव्हा २००७ चे विश्वविजेते कर्णधार एम.एस. धोनी आणि २०२४ चे विश्वविजेते कर्णधार रोहित शर्मा ट्रॉफी घेऊन मैदानात आले.

सामन्याचा टॉस न्यूझीलंडने जिंकला आणि कर्णधार मिचेल सँटनरने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. पण भारतीय ओपनर्सनी पॉवरप्लेमध्ये सँटनरचा निर्णय चुकीचा ठरवला. संजू सॅमसन आणि अभिषेक शर्माच्या जोडीने पॉवरप्लेच्या ६ षटकांत एकही विकेट न गमावता ९२ धावा केल्या, जो टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वात मोठा पॉवरप्ले स्कोर आहे.

भारतीय सलामीवीरांनी ९८ धावांची सलामीची भागीदारी केली. ही भागीदारी रचिन रवींद्रने अभिषेक शर्माला झेलबाद करून मोडली. अभिषेक २१ चेंडूंमध्ये ५२ धावा करून बाद झाला. ही टी-२० विश्वचषक फायनलच्या इतिहासातील सर्वात मोठी सलामीची भागीदारी आहे.●अभिषेक बाद झाल्यानंतर ईशान किशन क्रीझवर आला. सॅमसनने ईशान किशनसोबत दुसऱ्या विकेटसाठी शतकी भागीदारी केली. या जोडीने ४८ चेंडूंमध्ये १०५ धावा जोडल्या. याच्या मदतीने टीम इंडियाची धावसंख्या १५ षटकांत २०० च्या पुढे गेली.

एकेकाळी असे वाटत होते की भारतीय संघ २० षटकांत ३०० धावांचा टप्पा पार करेल. मात्र, १६वे षटक घेऊन आलेल्या जिमी नीशमने एका षटकात ३ बळी घेऊन रन रेटला ब्रेक लावला. त्याने पहिल्या चेंडूवर संजू सॅमसनला (८९ धावा), पाचव्या चेंडूवर ईशान किशनला (५४ धावा) आणि शेवटच्या चेंडूवर कर्णधार सूर्यकुमार यादवला (शून्य) पॅव्हेलियनमध्ये पाठवले. पुढील २४ चेंडूंमध्ये फक्त २८ धावाच झाल्या. त्यानंतर शिवम दुबेने २०व्या षटकात ३ चौकार आणि २ षटकारांच्या मदतीने २४ धावा केल्या आणि टीम इंडियाचा स्कोर २५५ धावांपर्यंत पोहोचवला. टी-२० विश्वचषक अंतिम सामन्याच्या इतिहासातील ही सर्वात मोठी धावसंख्या आहे.२५६ धावांचे लक्ष्य गाठणाऱ्या न्यूझीलंडची सुरुवात खराब झाली. संघाने पॉवरप्लेमध्ये ५२ धावा करताना ३ विकेट गमावल्या. फिन ॲलन (९ धावा), रचिन रवींद्र (एक धाव) आणि ग्लेन फिलिप्स (५ धावा) लवकर बाद झाले. सुरुवातीचे विकेट्स लवकर गमावल्यानंतरही सलामीवीर टिम सायफर्टने एक बाजू सांभाळून ठेवली. त्याने २६ चेंडूंमध्ये ५२ धावांची खेळीही केली. त्याच्याशिवाय कर्णधार मिचेल सँटनरने ४३ धावा केल्या. पण संघाचा पराभव टाळू शकले नाहीत. त्यांचा संघ १९ षटकांत १५९ धावांवर सर्वबाद झाला.

पॅनल देणे आहे

सणांचा आनंद आणि बचतीची सुवर्णसंधी घेऊन येत आहे
ओम महाले अँड ग्रुप प्रस्तुत
पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
PBM Jeweller's
अशोक चौक, चावडीजवळ, संगमनेर, जि. अ. नगर
१ तारखेपासून सुरू – फ्री GST स्कीम
होळीच्या शुभमुहूर्तावर सुरु होणारी ही खास ऑफर थेट रमजान ईदपर्यंत – संपूर्ण एक महिना!
- संपर्क - 7599996999 8265036807
लग्नकार्य, वाढदिवस किंवा खास गिफ्टसाठी हीच योग्य वेळ!
या कालावधीत सोनं, चांदी आणि आकर्षक दागिन्यांची खरेदी करा आणि मिळवा GST पूर्णपणे फ्री!
विश्वास, गुणवत्ता आणि शुद्धतेची खात्री पोपट भगीरथ महाले ज्वेलर्स!
मर्यादित कालावधीची ऑफर
आजच भेट द्या आणि बचतीचा सुवर्णयोग साधा!

पॅनल देणे आहे



नोकरीची सुवर्णसंधी
CONTACT : 98223 43319
सेल्समन .................... 05
सेल्सगर्ल.................... 05
कॉम्प्युटर ऑपरेटर.... 02
हेल्पर......................... 03
We are HIRING!
भंडारी क्लॉथ सेंटर
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# एकवीरा फाउंडेशनचा अनोखा उपक्रम

## क्रिकेट-रस्सीखेच स्पर्धेत महिलांचा जल्लोष



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - प्रत्येक महिलांचे त्यांच्या कुटुंबाचे व राज्याच्या विकासात मोठे योगदान राहिले आहे. कायम कष्ट आणि शेती मातीत राबणाऱ्या महिलांना आहार व्यायाम आरोग्य जाणीव जागृती निर्माण करून देणाऱ्या एकवीरा फाउंडेशनने आयोजित केलेल्या क्रीडा महोत्सवात सुमारे ५००० महिलांनी अत्यंत उत्स्फूर्त सहभाग घेतला असून विविध खेळांचा त्या अत्यंत आनंद घेत आहेत.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात क्रीडा संकुल येथे एकविरा फाउंडेशन च्या वतीने महिला दिनाच्या निमित्ताने क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला असून यामध्ये ५३२७ महिलांनी सहभाग नोंदवला. क्रिकेट रस्सीखेच आणि बॅडमिंटन स्पर्धेसाठी महिलांची मोठी गर्दी असून दररोज २२ क्रिकेटचे सामने असून ३० रस्सीखेच सामने होत आहेत. महिला युवती व वयोवृद्ध आजी सुद्धा या स्पर्धेमध्ये सहभागी होते आहे. विविध झालेल्या क्रिकेट स्पर्धांमधून षटकारा चौकारांची आतिषबाजी महिलांनी केली यावेळी मात्र मैदानावर झालेला जल्लोष हा पाहण्यासारखा होता.

प्रत्येक षटकार चौकार आणि गोलंदाजाने बळी घेतल्यानंतर डीजे च्या आवाजावर होणारा महिलांचा जल्लोष हा सर्व महिलांसाठी आनंद देणार आहे. कायम शेतीमातीत राबणाऱ्या महिला क्रीडा संकुलात येऊन आपल्या कलागुणांना वाव देत आहेत याचबरोबर या माध्यमातून नवीन मैत्रिणी जोडत आहे.

यावेळी बोलताना डॉ जयश्रीताई थोरात म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर तालुक्याने कायम महिलांचा मोठा सन्मान केला आहे. या क्रीडा महोत्सवात महिलांचा अत्यंत मोठा सहभाग लाभत असून खेळाबरोबरच नवीन मैत्रिणी जोडल्या जात आहेत आरोग्य, आहार, नातेवाईक, नवीन वाचन बचत गट मोकळा वेळ याबाबत होणारी चर्चा ही अत्यंत दिलासादायक आहे. यातूनच नवी पिढी घडणार असून नव्या पिढीला ऊर्जा देणारी अनेक चांगली व्यक्तिमत्व या स्पर्धेला भेट देत आहेत. तालुक्याची कन्या ऋतुजा गायकवाड ही जिल्हाधिकारी झाली असून तिची भेट ही सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याच्या त्या म्हणाल्या.

तर ऋतुजा गायकवाड म्हणाल्या की ग्रामीण भागातील महिलांसाठी डॉ. जयश्रीताई थोरात यांनी मोठे व्यासपीठ निर्माण करून दिली असून संगमनेरच्या महिलाही आता मागे राहणार नाहीत मलाही यापुढे महिला सबलीकरणांमध्ये अधिक काम करण्याची इच्छा असल्याच्या त्या म्हणाल्या.

या स्पर्धेमध्ये क्रिकेट स्पर्धेतील विविध महिला संघांनी आपले वेगळे ड्रेस परिधान केले असून अत्यंत काळजीपूर्वक होणारी फलंदाजी प्रत्येक धावेसाठी असणारी त्यांची तळमळ आणि सगळयात महत्त्वाची खेळी वेळेची आणि आनंदाचे वातावरण हे सर्व महिला दिनाच्या निमित्ताने सर्व महिलांसाठी आनंददायी आहे.

# आ. सत्यजित तांबे कार्यकर्त्यांसह रंगोत्सवात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरात सर्वत्र रंगपंचमीचा सण मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. शहरातील बसस्थानक परिसरात आमदार सत्यजित तांबे यांनी नगरसेवक, विविध पक्षांचे नेते, कार्यकर्ते, पत्रकार यांच्यासोबत एकमेकांना रंग लावून रंगपंचमी साजरी केली.

शहर बसस्थानकासमोर छत्रपती संभाजी महाराज मित्र मंडळाचे अध्यक्ष सतीश आहेर यांच्या पुढाकाराने नेहमीप्रमाणे सर्व राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर एकत्रित येत रंगपंचमी आनंद लुटत असतात. रविवारी या आनंदात आ. सत्यजित तांबे हे देखील सहभागी झाले होते. शिवसेनेचे नेते व माजी नगरसेवक कैलास वाकचौरे यांना रंग लावत राजकीय मैत्रीचा आनंद देखील घेतला. यावेळी नगरसेवक विश्वास मुर्तडक, गजेंद्र अभंग, गणेश गुंजाळ, सौरभ कासार तसेच सतीश आहेर, निखिल पापडेजा, शाम कर्पे, सुभाष दिघे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. रंगपंचमीचा आनंद घेतल्यानंतर सर्वांनी चहा भजी आस्वाद घेतला.

दरम्यान शहरातील विविध भागांत सकाळपासूनच रंगाची उधळण सुरू केली. पर्यावरणपूरक उपक्रमांना प्राधान्य देत अनेकांनी इको-फ्रेंडली रंगांचा वापर केला. संपूर्ण शहरात बाल गोपाल, महिलांसह तरुणांनी आनंद, उत्साह आणि रंगांची उधळण केल्याने संपूर्ण संगमनेरकर रविवायी रंगबिरंगी दिसत होते. रंगपंचमीचा सण जल्लोषात साजरा करताना कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला होता.

# सरपंच उज्वला देशमाने यांची राष्ट्रीय परिषदेसाठी निवड



युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर-

येथील सरपंच उज्वला नवनाथ देशमाने यांची बुधवारी (ता.११) नवी दिल्ली येथे होणाऱ्या महिला लोकप्रतिनिधी राष्ट्रीय परिषदेसाठी सरपंच म्हणून उपस्थित राहण्याचा मान मिळाला आहे.

केंद्र सरकारच्यावतीने नवी दिल्ली येथे महिला लोकप्रतिनिधींची राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. देशभरातील विविध राज्यांमधून निवड करण्यात आलेल्या महिला लोकप्रतिनिधींना या परिषदेसाठी निमंत्रित करण्यात आले असून अहिल्यानगर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी सरपंच उज्वला देशमाने यांची निवड करण्यात आली आहे. सरपंच देशमाने यांनी ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या लोकसहभागातून धांदरफळ बुद्रुक गावात विविध विकासकामे मार्गी केले आहेत. गावातील पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवून गावाच्या विकासाला गती देण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

राष्ट्रीयस्तरावर सरपंचांचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणे ही आपल्या गावासाठी व तालुक्यासाठी अभिमानाची बाब असून, या माध्यमातून ग्रामीण भागातील विकासकामांचे अनुभव मांडण्याची संधी मिळणार असल्याची प्रतिक्रिया देशमाने यांनी व्यक्त केली. त्यांच्या या निवडीबद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे, आ.सत्यजित तांबे, बाळासाहेब देशमाने, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

INVOFIX
आजच सोलर सिस्टीम लावा व आपले लाईट बिल शुन्य करा
शासनामार्फत मिळणारी सबसिडी
1KW 30,000/- Rupees
2KW 60,000/- Rupees
3KW 78,000/- Rupees
सौर उर्जा आजची गरज.. उद्याची बचत..
उपलब्ध सुविधा
१. बँक लोन सुविधा उपलब्ध
२. विज बिल शुन्य करा
३. मोफत मार्गदर्शन
४. फ्री साईट व्हिजीट
५. एक्सपर्ट टिम, क्वालिटी वर्क
PM SURYA GHAR
आजच योजनेचा लवकरात लवकर लाभ घ्या व भरघोस सबसिडी मिळवा.
Invofix Solution Pvt. Ltd., स्वागत मंगल कार्यालया समोर, अकोले बायपास रोड, संगमनेर ४२२६०५, जि. अहिल्यानगर.
7030334486 7030334494

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का? काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✲ कर्ज रक्कम वाढ । ✲ कर्ज व्याजदर कमी । ✲ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
किडनीच्या आजारांवर संगमनेरमध्ये परिपूर्ण उपचार
डायलिसीस उपलब्ध सुविधा
अत्याधुनिक मशिनरीद्वारे डायलिसीस
• 24x7 Technician
• One Time Blood Tubing Use
• Modern Dialysis Centre
• Nephrologist, AVF Surgery
• Renal Dialysis
• Dialysis Catheter Insertion
स्पेशालिस्ट - डॉ. नागेश अघोर (किडनीविकार तज्ञ) MBBS, MD, DNB, MNAMS
२४ तास सुविधांसाठी ०२४२५ - २२४७६२ ७०३८२७०३८२

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणूंची कमी गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) अपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

दर्शन टेक्सटाईल मार्केट
मान्सून ऑफर 30% ते 70% डिस्काउंट सेल
तुमच्या सौंदर्याला उठाव देणारी लेडीज वेअर
सेले नव्हे होलसेल सेल
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर (०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर–४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25